बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादकः बाळासाहेब मस्के

बीड | शनिवार, दि. २८ जुलै २०२४ | वर्ष ३ रे | अंक ३६३ वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

## सरकारी नोकरीची सुवर्णसंधी!

मुंबई : सरकारी नोकरी करण्यासाठी इच्छुक असणाऱ्यांसाठी एक आनंदाची बातमी समोर आली आहे. भारतीय आयुर्विमा महामंडळाने (डखउ) मेगाभरती जारी केली आहे. कनिष्ठ सहाय्यक या पदाच्या तब्बल २०० रिक्त जागांसाठी ही भरती जारी केली आहे. यासाठी अर्ज प्रकिया सुरु झाली असून इच्छुक उमेदवार १४ ऑगस्ट २०२४ पर्यंत अर्ज करु शकणार आहेत. अर्ज करणाऱ्या उमेदवाराने मान्यताप्राप्त विद्यापीठातून ६० टक्के गुणांसह पदवी प्राप्त केलेली असणे गरजेचे आहे. उमेदवाराला संगणकाचे ज्ञान असणे आवश्यक आहे. तसेच २१ ते २८ वर्षे वयोगटातील उमेदवारच या पदासाठी अर्ज करू शकणार आहेत.

पावसामुळे जनजीवन झाले विस्कळीत



# अस्मानीचा कहर!!

घरभर चिखल, पिण्याच्या पाण्याचे वांदे • वीज खंडित; पुणेकरांचे होताहेत हाल! • प्रशासनाने योग्य त्या उपाययोजना कराव्यात

पुणे/पुण्यभूमी प्रतिनिधी
रत्नागिरी जिल्ह्यात थैमान घातलेल्या पावसाने शुक्रवारी सकाळपासून काहीशी विश्रांती घेतली. त्यामुळे नागरिकांना दिलासा मिळाला आहे. मात्र तरीही कालच्या अतिवृष्टीचा फटका नागरिकांना आजही सोसावा लागत आहे. काल पुण्यात पावसाने जोरदार हजेरी लावल्यामुळे निर्माण झालेली पूरस्थिती नियंत्रणात आली आहे. तसेच खडकवासला धरणातूनही मोठ्या प्रमाणात होणारा विसर्ग घटला आहे. परंतु घराघरात चिखल झाला असून पिण्याच्या पाण्यासह वीजेचा खंड पडल्यामुळे पुणेकर त्रस्त झाले आहेत.

## खडकवासला धरणातून विसर्ग कमी

खडकवासला धरणातून पाण्याचा विसर्ग पुन्हा करण्यात कमी आला आहे. याआधी ३१ हजार क्यूसेकवरून पाण्याचा विसर्ग कमी करत तो केवळ १३ हजार क्युसेक करण्यात आला आहे. खडकवासला धरण साखळी क्षेत्रात पाऊस थांबल्याने प्रशासनाकडून हा निर्णय घेण्यात आला.

## महाविद्यालयांना आजही सुट्टी जाहीर

पुण्याला हवामान विभागाने आज ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. या पार्श्वभूमीवर पुणे जिल्हा प्रशासनाने शाळा आणि महाविद्यालयांना सुट्टी जाहीर केली. तसेच सुट्टीच्या कालावधीत मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी कार्यालयीन वेळेत शाळेत उपस्थित राहून प्रशासनाच्या आदेशानुसार आपत्ती व्यवस्थापनाचे कामकाज करावे अशा सूचनाही केल्या आहेत.

## मुंबई-पुणे दरम्यान धावणाऱ्या रेल्वे गाड्याही रद्द

हवामान विभागाने मुसळधार पावसाचा अंदाज व्यक्त केल्याने मुंबई-पुणे दरम्यान धावणाऱ्या एक्स्प्रेस गाड्या रद्द करण्यात आल्या आहेत. मुंबई-पुणे दरम्यान धावणारी (१२१२७) इंटरसिटी एक्सप्रेस, (१२१२४) डेक्कन क्वीन आणि (१२१२६) प्रगती एक्स्प्रेस या तीन गाड्या रद्द करण्यात आल्या आहेत. गाड्या रद्द केल्याने प्रवाशांची ऐनवेळी गैरसोय होऊ नये, यासाठी त्यांना माहिती देण्यासाठी पुणे रेल्वे स्थानकावर मदत कक्ष सुरू करण्यात आला आहे. या कक्षात रेल्वेचे कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. प्रवाशांना पर्यायी गाड्यांची माहिती देण्याची व्यवस्था या कक्षाच्या माध्यमातून केली जात आहे

## एकता नगरमध्ये वीज खंडित

पुण्यातील सिंहगड रोड परिसरातील एकता नगरमध्ये वीज खंडित पडली आहे. तसेच पिण्याच्या पाण्यासह वापरण्यासाठीही पाणी उरले नसल्यामुळे या परिसरातील लोकांचे मोठ्या प्रमाणात हाल सुरू आहेत. तसेच म हानगरपालिकेकडून पोहोचवण्यात येणारे पिण्याचे पाणी अजूनही लोकांपर्यंत पोहोचले नसल्याने नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे.

## पावसामुळे सहा जणांना मृत्यू

शहरात मुसळधार पावसाने रौद्ररुप धारण केले होते. यामुळे पुण्यातील डेक्कन परिसरात पुलाची वाडी येथे शॉक लागून तीन तरुणांचा मृत्यू झाला. तर कात्रज तलावात बुडून दोघांचा तसेच ताम्हिनी घाटात एका तरुणाचा मृत्यू झाला. शहरातील पाणी पातळी कमी होवून लवकर जिवनमाने सुधारण्याची गरज आहे. पुणे परिसरातील नागरिकांना मात्र पावसामुळे कसल्याही प्रकारचे घराबाहेर पडता येत नसल्याचे दिसून येत आहे.

# ओबीसी आरक्षण संविधानिक झाले पाहिजे

**ॲड. प्रकाश आंबेडकर : शरद पवारांचे स्टेटमेंट अत्यंत घातक**

पुणे /पुण्यभूमी प्रतिनिधी
वंचित बहुजन आघाडीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या आरक्षण बचाव यात्रेची सुरुवात मुंबई, चैत्यभूमी येथून सुरू होऊन ती आज महात्मा फ ुले वाड्यात आली. या वेळी आंबेडकर यांनीमहात्मा फुले आणि सावित्रीमाई फुले यांना अभिवादन केले. या वेळी आंबेडकर म्हणाले की, डल आणि डीं यांचे आरक्षण संविधानिक झालेले आहे. ओबीसी आरक्षण सुद्धा संविधानिक झाले पाहिजे.



ॲड. आंबेडकर म्हणाले की, मध्यंतरी शरद पवारांचे स्टेटमेंट होते की, आम्ही समाजाचे २२५ आमदार निवडून आणणार. यामधून असे दिसते की, ओबीसीचे आरक्षण कायमस्वरूपी स्थगित करायचे. आरक्षणाच्या संदर्भातील परिस्थिती सांगणे गरजेचे आहे. आता निर्णायक वेळ आहे. मिळालेल्या अधिकारांसोबत आहात की, नेत्यांच्या आणि संघटनेच्या सोबत आहे. आरक्षण वाचवायचे असेल, तर विधानसभेत ओबीसींचे १०० आमदार निवडून आणणे गरजेचे असल्याचेही त्यांनी म्हटले आहे. आपण कोणत्याही पक्षात असाल, तर तिथे ओबीसींना उमेदवारी मिळावी म्हणून प्रयत्न केले पाहिजे. जोपर्यंत उमेदवारी मिळत नाही तोपर्यंत आपण पान २ वर...

# सर्वोच्च न्ययालयाने तडीपार केलेला माणूस

**राजकीय : शरद पवारांचा अमित शाहांवर पलटवार**

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी
सर्वोच्च न्यायालयाने तडीपार केलेला माणूस आज देशाचा गृहमंत्री आहे, अशी टीका शरद पवार यांनी अमित शाह यांच्यावर केली आहे. अमित शाह यांनी शरद पवार यांचा 'भ्रष्टाचारी लोकांचे म्होरके' असा उल्लेख केला होता. शाहांच्या त्या टीकेला शरद पवार यांनी आज चोख प्रत्युत्तर दिलं. अमित शाह यांना सर्वोच्च न्यायालयाने गुजरातमधून तडीपार केलं होतं आणि



आता ते देश चालवतायत, असं शरद पवार यांनी म्हटलं आहे. महाराष्ट्रातील भ्रष्टाचाराला शरद पवारांनीच संस्थात्मक स्वरूप दिलं, अशी टीका शाह यांनी केली होती. त्या टीकेवर शरद पवार यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

ज्येष्ठ नेते आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार या पक्षाचे सर्वे सर्वा शरद पवार म्हणाले, अमित शाह हे आता देशाचे गृहमंत्री आहेत. ते मागे एका भाषणात म्हणाले होते, शरद पवार हे भ्रष्टाचारी लोकांचे सुभेदार आहेत. परंतु, देशाच्या गृहमंत्रिपदावर बसलेल्या या माणसाला सुप्रीम कोर्टाने तडीपार केलं होतं. अमित पान २ वर...

# जादुटोणा विरोधी समितीवर सामील व्हावे

**निर्णय : समाज कल्याणचे इच्छुकांना आवाहन**

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी
बीड जिल्ह्यातील इच्छुकांनी जादुटोणा विरोधी समितीवर सामील व्हावी, असे आवाहन सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांनी केले आहे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय अन्वये जिल्हा स्तरावरील जादुटोणा विरोधी कायदा जनजागृती प्रचार व प्रसार कार्यक्रम अंमलबजावणी समिती गठित निर्देश देण्यात आलेले आहेत.सदर समितीमध्ये जिल्हा समन्वयक म्हणून सदस्य निवड करणेकरीता जादुटोणा विरोधी काम करणाऱ्या इच्छुक सदस्यांनी जादुटोणा विरोधी काम करत असलेबाबतच्या पुराव्यासह आपला अर्ज दिनांक १५ ऑगस्ट २४ पर्यंत सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण बीड कार्यालयास सादर करावेत असे आवाहन सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण बीड यांनी केले आहे.

# राज ठाकरे महायुतीबरोबर येतील

**चर्चेतले : शिवसेना नेत्याने व्यक्त केला विश्वास**

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी
मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी गुरुवारी मुंबईत झालेल्या पदाधिकारी मेळाव्यात स्वबळावर लढणार असल्याची घोषणा केली. त्यानंतर आता शिवसेना नेत्याने राज ठाकरे महायुतीबरोबर येतील असा विश्वास व्यक्त केला आहे. राज ठाकरेंनी जी भूमिका जाहीर केली त्यावर आज संजय राऊत यांनी बोचरी टीका केली. बिनशर्ट पाठिंबा देणाऱ्या राज ठाकरेंनी आता भूमिका बदलली असं ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत म्हणाले. मात्र शिवसेना (एकनाथ शिंदे) नेत्याने राज ठाकरे महायुतीबरोबर येतील असा विश्वास व्यक्त केला आहे.

**राज ठाकरे नेमकं काय म्हणाले होते?:** विधानसभा निवडणूक ही अत्यंत चुरशीची आणि घमासान असलेली होणार आहे. या निवडणुकीत मला आपले




आमदार निवडून आलेले पाहिजेत म्हणजे पाहिजेतच. काय घडतं आहे, काय घडू शकतं? याचं आकलन करा. मी तुम्हाला खरं सांगतो निवडून येण्याची क्षमता असलेल्यांनाच तिकिट मिळेल. असं राज ठाकरे म्हणाले आहेत.

२५० जागांवर लढायची तयारी : युती होईल का? कोणत्या जागा मिळतील? असला कुठलाही विचार मनात कुणीही आणू नका. आपण पान २ वर...

# कोमलवाडी ते भोजगाव रस्त्याची दुरावस्थ

**संतप्त** | **अनेक वर्षांपासून हा रस्ता डांबरापासून वंचित**

गेवराई/पुण्यभूमी प्रतिनिधी
गेवराई : तालुक्यातील कोमलवाडी ते भोजगाव रस्त्याची पावसाळ्यात दुरवस्था झाली आहे. ४ किलोमीट अंतराचा रस्ता हा जीवघेणा बनला असून पावसामुळे रस्त्यावर चिखल होऊन दयनीय अवस्था झाली आहे. सध्या पावसाळा सुरू असल्याने रस्त्यावर चिखलाचे साम्राज्य असून नागरिकांना अक्षरशः गाळातून मार्गक्रमण करावे लागत आहे. मागील अनेक वर्षांपासून डांबरापासून वंचित असलेल्या या प्रमुख रस्त्याकडे कार्यसम्राट आमदार लक्ष्मण पवार यांनी ताबडतोब लक्ष देऊन डांबरीकरण करणे अपेक्षित आहे. कोमलवाडी व भोजगाव ही ग्रुप ग्रामपंचायत असून या दोन्ही गावांना जोडणारा प्रमुख रस्ता आहे. त्यामुळे नागरिकांना मोठ्या कसरतीने या रस्त्यावरून प्रवास करावा लागत आहे. ग्रामपंचायत भोजगाव



येथे असल्यामुळे ग्रामस्थांना त्याठिकाणी जावं लागतं, सध्या पावसाळा सुरू असल्याने हा चार किलोमीटर अंतराचा रस्ता चिखलमय होऊन रस्त्यात

मागील काही वर्षांपूर्वी कोमलवाडी फाट्यापासून ते कोमलवाडी गावालगत रास्त्याचे अर्धवट डांबरीकरण झालेले आहे. कोमलवाडी ते भोजगाव या रस्त्याची दयनीय दुरवस्था झालेली आहे. रस्त्यावर मोठ्या प्रमाणात चिखलाचे साम्राज्य असून नागरिकांना अक्षरशः गाळातून मोठी कसरत करावी लागत आहे. त्यामुळे सध्या काही मुरुम टाकून नागरिकांना येण्या जाण्यासाठी उपाययोजना केल्या आहेत. सदरील हा रस्ता डांबरीकरण करण्यासाठी आम्ही आतापर्यंत आमदार लक्ष्मण पवार यांच्याकडे वेळोवेळी पाठपुरावा केलेला आहे. यापुढे देखील करणार आहोत. सदरील हा रस्ता डांबरीकरण होणारच आहे. परंतु लवकरात लवकर होण्यासाठी प्रयत्न करणार.
–सूर्यकांत धनवडे, उपसरपंच कोमलवाडी

पान २ वर...

# गेवराईत ज्ञानराधावर संचालक मडळावर गुन्हे!

**आक्रमक : तीनशे खातेदारांनी एकजूट दाखविली**

तलवाडा/पुण्यभूमी प्रतिनिधी
साईराम मल्टिस्टेट सह अन्य बँकांमध्ये ठेवीदारांचे कोट्यवधी रुपये अडकले आहेत. ठेवीदारांना आश्वासनावर आश्वासनेच दिली जात आहेत. ठेवीदारांनी आपल्या पैशासाठी विविध आंदोलने केली मात्र यश मीळाले नाही यातच राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्रजी पवार साहेबांच्या पक्षाच्या किसान सेलच्या प्रदेशाध्यक्ष पुजा मोरे यांच्या नेतृत्वात दि.४ रोजी गेवराईच्या छ.शिवाजी महाराज चौक ते पोलीस स्टेशन पर्यंत हलगी बजाओ मोर्चा काढला होता. या आंदोलनाने पोलीस प्रशासन चांगलेच हादरले होते. काल दि.४ रोजी मादळमोही ( ता. गेवराई) येथील टेलरिंग व्यवसाय करणाऱ्या तक्रारदाराने दिलेल्या फिर्यादीवरून



त्यांच्यासह ३०३ खातेदारांना ९ कोटी ३७ लाख ७१ हजार ७४७ रूपयांना फसवल्याप्रकरणी गेवराई पोलिस ठाण्यात कुटे, कुलकर्णीसह १५ जणांविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. तर बीडच्या शिवाजीनगर पोलिस ठाण्यात सेवानिवृत्त पोलिस निरीक्षकाच्या तक्रारीवरून कुटे, कुलकर्णीसह १० जणांविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. दरम्यान आधीच बीडच्या एलसीबीला घोटाळेबाज यशवंत कुलकर्णी अजुनही सापडलेला नाही. त्यातच आज पुन्हा कुलकर्णीवर दोन गुन्हे दाखल झाले आहे. एलसीबीचा ताण आणखी वाढला आहे. किती ठेवीदारांनी आत्महत्या केल्यावर कुलकर्णीचा आणि साईराम मल्टिस्टेटच्या श्री. साईनाथ परभने यांचा शोध घेणार आहे ? असा प्रश्न पुजा मोरे पान २ वर...

# विश्वासामागील वास्तव!

न्याय केवळ करून चालत नाही. तो केला जात असल्याचे 'दिसावे'ही लागते. हे तत्त्व सत्ताकारणासही असेच्या असे लागते. म्हणजे सत्तास्थानी असलेल्यांनी आपले वर्तन किती समन्यायी आहे असा कितीही आक्रोश केला तरी ते तसे आहे असे 'दिसावे'देखील लागते. ते तसे दिसून येत नसेल तर सत्ताधीशांचा कंठशोष वाया जातो आणि नागरिकांस जे 'दिसलेले' नाही ते आहे असे भासवण्याचे सर्व प्रयत्न अंतिमत: निरर्थक ठरतात. या सत्याची सत्ताधीशांस नव्याने जाणीव करून देण्याचे निमित्त म्हणजे अर्थसंकल्पात केंद्राने विरोधी पक्षीयांच्या राज्यांबाबत सापत्नभावाचे धोरण अंगीकारले असल्याचा विरोधकांचा आरोप. त्यावर संसदेत बुधवारी बराच गदारोळ झाला आणि अर्थमंत्र्यांसह अन्यांवर त्याबाबत खुलासा करण्याची वेळ आली. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आपल्या ताज्या अर्थसंकल्पात आंध्र प्रदेश आणि बिहार या राज्यांवर खैरात केली असे विरोधकांचे म्हणणे, तर आपण या राज्यांबाबत असे काही विशेष औदार्य दाखवलेले नाही, असा सत्ताधीशांचा खुलासा. यावर आरोप–प्रत्यारोपांच्या फैरी अजूनही सुरूच असून या आरोपाचा डाग सत्ताधीशांच्या वस्त्रप्रावरणांवरून इतक्या लवकर धुतला जाण्याची शक्यता नाही. अशा परिस्थितीत हे मुदलात झालेच का आणि त्यामुळे आता काय होईल याची चर्चा आवश्यक ठरते.जे झाले त्यास सर्वथा अर्थमंत्री निर्मला सीतारामन जबाबदार असल्याचे वरवर दिसत असले तरी अर्थसंकल्प, त्याचे भाषण ही मंत्रिमंडळाची सामुदायिक जबाबदारी असते. तेव्हा आपला अर्थमंत्री संकल्पाच्या भाषणात एकूण वेळेतील एकचतुर्थांश वेळ फक्त दोन राज्यांवर– आंध्र प्रदेश आणि बिहार– व्यतीत करत असेल तर ते बरे 'दिसणार' नाही, हे कळण्याइतके राजकीय शहाणपण या सरकारने दाखवायला हवे होते. विशेषत: एकहाती बहुमताचा आणि त्यामुळे विरोधकांस कस्पटासमान लेखण्याचा काळ आता सरला, यापुढे अनेकांस बाबापुता करत सरकार चालवावे लागणार आहे याचे तरी भान सत्ताधीशांतील चाणक्य वा तत्समांस यायला हवे होते. ते नसल्यामुळे निर्मलाबाई जवळपास २४ मिनिटे फक्त या दोन राज्यांस काय काय देण्यात आले आहे यावरच बोलत असल्याचे मंत्रिमंडळातील कोणास लक्षात आले नाही आणि त्यामुळे याचे राजकीय परिणाम किती दूरगामी होतील हेही या मान्यवरांस जाणवण्याचा प्रश्न आला नाही. निर्मलाबाईंनी अर्थसंकल्पीय भाषणात केलेली ही केवळ शब्दसेवा नव्हती. याच्या जोडीला जवळपास ७०–७५ हजार कोटी रुपयांचे प्रकल्प, योजना या राज्यांसाठी त्यांनी जाहीर केल्या. विरोधकांस आणि देशासही गुजरात वगळता अन्य राज्यांबाबत अशा अर्थसंकल्पीय औदार्याचा अनुभव नाही. त्यामुळे बिहार आणि आंध्र प्रदेशास इतके काही दिले जात असल्याचे पाहून सगळ्यांचेच डोळे दिपले आणि या सढळ हातांमागील कारणांचा शोध सुरू झाला. या दोन राज्यांतील २८ खासदारांचा सरकारला असलेला टेकू हे कारण अशा वेळी समोर येणे साहजिकच. त्यामुळे राजकीय पाठिंबा आणि आर्थिक दानशूरता यांचा संबंध जोडला जाणेही साहजिक. तसा तो जोडला गेला आणि विरोधकांनी त्यावर ठणाणा केला. आता सरकार म्हणते असे काही नाही, आम्ही अन्य राज्यांनाही तसे बरेच काही दिलेले आहे; पण सगळ्याचाच उल्लेख अर्थसंकल्पात कसा करणार?याही पलीकडे मुद्दा असतो आणि आहे तो नागरिकांस काय खरे वाटते हा. त्या वेळी २०१४ साली विरोधकांचा प्रचार नागरिकांस खरा वाटला आणि त्यांनी 'ते' कथानक स्वीकारले कारण त्या वेळी सत्ताधीशांचे वर्तन तसे होते. त्याचप्रमाणे आताही ताज्या लोकसभा निवडणुकीत 'घटना बदला'चा विरोधकांचा आरोप नागरिकांस सत्याच्या जवळ जाणारा वाटला आणि आताही दोन राज्ये वगळता अन्यांबाबत सरकार हात आखडता घेत असल्याची टीका नागरिकांस रास्त वाटते कारण सत्ताधीशांचे वर्तन तसे आहे. त्या वेळचे सत्ताधीश, विशेषत: पंतप्रधान मनमोहन सिंग, काँग्रेसच्या दांडगट नेत्यांसमोर हतबुद्ध वाटले आणि म्हणून त्या वेळी नागरिकांनी तत्कालीन विरोधकांच्या कथानकावर विश्वास ठेवला. आता परिस्थिती नेमकी विरोधी आहे. पण तरीही परिणाम तोच. विरोधकांच्या कथानकावर नागरिकांचा विश्वास बसतो, हा! तेव्हा विरोधकांविरोधात बोटे मोडण्याने काहीही होणार नाही. त्यांच्या कथानकांवर नागरिकांचा विश्वास का बसतो हे वास्तव समजून घेण्याचा प्रामाणिकपणा हवा.

# ईपीएस-९५ पेंशनधारकांच्या उत्थानासाठी



रमेश लांजेवार,नागपूर
मो.नं.९९२१६९०७७९

आज राज्यात १५ ते २० लाख ईपीएस–९५ पेंशनधारक आहेत. केंद्र सरकारने जाहीर केलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात ईपीएस–९५ पेंशन धारकांना न्याय मिळेल अशी अपेक्षा होती.परंतु निराशा हाती आली.परंतु त्याची पुर्तता राज्य सरकार एखाद्या योजनेअंतर्गत अवश्य करू शकते व यावर राज्य सरकार तोडगा सुध्दा अवश्य काढू शकते यात दुमत नाही. आता राज्य सरकारने एखाद्या योजनेअंतर्गत यावर तोडगा काढुन ईपीएस पेंशन धारकांना सहकार्य करणे गरजेचे आहे.अर्थसंकल्पीय अधिवेशनात ईपीएस–९५ पेंशन धारकांच्या पेंशन बद्दल काहीतरी तोडगा निघेल व न्याय मिळेल या आशेने देशातील दिड करोड पेंशनधारक सरकारच्या निर्णयाकडे मोठ्या आशेने पाहत होते.परंतु चालू अर्थसंकल्पीय अधिवेशनात केंद्र सरकारने ईपीएस–९५ पेंशनधारकांना निराश केल्याचे दिसून आले.परंतु महाराष्ट्रातील १५ ते २० लाख ईपीएस–९५ पेंशन धारकांना महाराष्ट्र सरकार अवश्य दिलासा व न्याय देवू शकते यात दुमत नाही.कारण महाराष्ट्र सरकारने राज्यातील जनतेच्या कल्याणासाठी अनेक योजना महत्वपूर्ण योजना अंमलात आणल्यात व या योजनांचा लाभ राज्यातील जनतेला मिळत आहे ही स्वागतार्ह बाब आहे याचे मी मनापासून स्वागत करतो.आजही महाराष्ट्रातील ईपीएस–९५ पेंशन धारकांना ८००,१०००,३००० रूपये अशा रूपात तुटपुंजी पेंशन मिळत आहे.अशा परिस्थितीत महाराष्ट्र सरकारने ईपीएस–९५ पेंशन धारकांच्या मदतीसाठी सरसावले पाहिजे.कारण राज्यात होवून घातलेल्या विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर १५ ते २० लाख पेंशन धारक व त्यांच्या परिवार यांचा फायदा सरकारला येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत अवश्य होईल.त्यामुळे ईपीएस पेंशन धारकांना राज्य सरकार कडून मदत करने अपेक्षित आहे.महाराष्ट्र सरकारने नुकतीच लाडकी बहिण योजना अंमलात आणली व या योजनेला मोठ्या प्रमाणात प्रतिसाद सुध्दा मिळत आहे.या पाठोपाठ सरकारने लाडका भाऊ योजना अंमलात आणली यांचाही युवकांना अवश्य लाभ होईल.या सर्व योजना पहाता ६० ते ८० वयाच्या ईपीएस–९५ पेंशन धारकांच्या पेंशनमध्ये भर टाकण्याचे काम महाराष्ट्र सरकारने केले पाहिजे अशी ईपीएस–९५ पेंशन धारकांची इच्छा आहे.कारण राज्याचा प्रत्येक कामगार हा शिल्पकार आहे;त्यामुळे देश घडविण्यासाठी नेहमीच त्याचा हातभार लावत असतो.ज्या पेंशन धारकांना ईपीएफओ कडून ८००,१०००,३००० रूपये इतकी पेंशन मिळत आहे यात महाराष्ट्र सरकारने थोडा भर टाकुन एखाद्या योजनेअंतर्गत कमीत कमी ५००० रूपयांपर्यत करावी अशी अपेक्षा पेंशन धारकांना आहे.याकरीता सरकारने ईपीएस–९५ पेंशनधारकांसाठी लाडके माय–बाप योजना अंमलात आणुन या योजनेअंतर्गत वृध्द ईपीएस–९५ पेंशन धारकांना सहकार्य करून सरकारने मदतीचा हात सामोर केला पाहिजे.कारण वाढती महागाई, इलेक्ट्रिक बिल,घर टॅक्स, औषधोपचार तुटपुंज्या पेंशनमध्ये ईपीएस–९५ पेंशन धारकांना पेलवत नाही.त्यामुळे वृद्धांसाठी मदतीचा हात सामोर करने सरकारचे सुध्दा प्रथम कर्तव्य आहे असे मला वाटते.कारण ईपीएस–९५ पेंशनधारक तुटपुंज्या पेंशनमध्ये जगुही शकत नाही आणि मरूही शकत नाही. अशी कठीण परिस्थितीत आज ईपीएस–९५ पेंशन धारकांची झाली आहे.ईपीएस पेंशन धारक आशावादी आहे. त्यामुळे राज्य सरकारने ईपीएस–९५ पेंशनधारकांसाठी लाडके माय–बाप योजना अंमलात आणुन सहकार्य करणे अपेक्षित आहे.

## लोकशाही सशक्तीसाठी सेवा महत्वाची

### डॉ. जयप्रकाश नारायण: यशस्वितांचा राष्ट्रीय पातळीवर सत्कार



अनिल चौधरी/ पुणे

लोकशाहीला सशक्तीसाठी प्रशासकीय अधिकार्यांची सेवा अत्यंत महत्वाची आहे. राष्ट्रप्रगतीसाठी मानव सेवा हा महत्वाचा घटक आहे. ग्रामीण क्षेत्राच्या उन्नतीसाठी प्रशासकीय सेवेत खूप काही करण्यासारखे आहे. त्याच प्रमाणे नव्या पिढीसाठी देशात गुणवत्तापूर्ण उत्तम दर्जाचे शिक्षण आणावे. असे मत लोकसत्ता पार्टीचे अध्यक्ष व माजी सनदी अधिकारी डॉ. जयप्रकाश नारायण यांनी मांडले.एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी व एमआयटी स्कूल ऑफ गर्व्हमेंट, पुणेतर्फे एमआयटी डब्ल्यूपीयूच्या संत ज्ञानेश्वर सभागृह, कोथरूड येथे आयोजित करण्यात आलेल्या केंद्रीय लोकसेवा आयोग (यूपीएससी) स्पर्धा परीक्षा२०२३ मध्ये यशस्वितांचा १४वा राष्ट्रीय पातळीवरील सत्कार सोहळ्याच्या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

केंद्रीय लोकसेवा आयोग (यूपीएससी) माजी अध्यक्ष डी.पी.अग्रवाल हे सन्माननीय पाहुणे म्हणून उपस्थित होते. अध्यक्षस्थानी एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष विश्वधर्मी प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड हे होते.यावेळी एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे कार्याध्यक्ष राहुल विश्वनाथ कराड, कुलगुरू डॉ.आर.एम.चिटणीस, डॉ. के. गिरीसन आणि प्रा.परिमल माया सुधाकर उपस्थित होते.या सोहळ्यात देशातून द्वितीय आलेले अनिमेष प्रधान यांना ७५ हजार रूपयांचे रोख पारितोषिक देण्यात आले. त्याच बरोबर १६० यशस्वितांना मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. शाल, मानपत्र असे सत्काराचे स्वरूप होते.डॉ. जयप्रकाश नारायण म्हणाले, सार्वजनिक सेवा ही एक विशेष सेवा असून ती समाज आणि देशाच्या विकासासाठी असावी. प्रशासकीय सेवेत कार्य करताना परिश्रमावर विश्वास ठेवा. सकारात्मक दृष्टीकोन ठेऊन कार्य करण्याची आवश्यकता आहे. लोकसेवेसाठी जास्तित जास्त वेळ देणे गरजेचे आहे. आपण जसा व्यवहार करू तशीच परतफ ड समाजाकडून मिळेल. मानवतेला प्राथमिकता देऊन त्यांच्या कल्याणासाठी कार्य करावे. डॉ.डी.पी अग्रवाल म्हणाले, नागरी सेवांमध्ये प्रवेश करण्याचा आपला हेतू कधीही विसरू नका. प्रत्येक सेवमध्ये प्रचंड आव्हाने आहेत. आपण लोकांच्या जीवनात बदल आणत आहोत. या क्षेत्रात राहूण आव्हानांचा सामना करावा. समाजाच्या व देशाच्या प्रगतीसाठी योग्य ध्येय धोरणे बनवूण त्यावर अंमलबजावीण करावी. प्रामाणिकता आणि पारदर्शीकतेने कार्य केल्यास देशाचा विकास होईल. डॉ. विश्वनाथ दा. कराड म्हणाले,करियर आणि जीवनाचे तत्वाज्ञान हे वेगवेगळे असते. त्याचे संतुलन ठेवून आपल्या जीवनाची प्रगती करावी. जीवनामध्ये शिस्त आणि चारित्र्य महत्वाचे असते. मानवता आणि सहिष्णूता हा संदेश लक्षात ठेऊन प्रशासकीय कार्य करावे. जगामध्ये विश्वशांतीचा मार्ग दाखविण्याचे कार्य आपल्या खांद्यावर आहे. राहुल कराड म्हणाले,समाजात जागृती घडवून आणण्याचा हा छोटासा प्रयत्न आहे. समाज परिर्वनात शिक्षण व्यवस्था सर्वोत्कृष्ट भूमिका पार करू शकते. डब्ल्यूपीयूमध्ये पारदर्शीकता असून येथे शिक्षणाबरोबरच सामाजिकतेला महत्व दिले आहे.

## पान एक वरून

**ओबीसी आरक्षण संविधानिक झाल**

१०० चा आकडा गाठत नाही, आणि हा आकडा आपण गाठत नसू तर आरक्षण वाचत नसल्याचे त्यांनी सांगितले. माझे आवाहन आहे की, आपण मतदार आहात. काँग्रेस, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) हे मराठा समाजाचे प्रतिनिधी आहेत. शिवसेना (उध्दव ठाकरे) आणि भाजप हे ब्राह्मण आणि कायस्थ यांचे प्रतिनिधी आहेत.जरांगे पाटील यांची मागणी आहे की, मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण द्या ही मागणी कायदेशीर नाही, असे कोणी म्हणत नाही. तोपर्यंत कोणावर विश्वास ठेवू नका. ही मंडळी फसवणूक करणारी असल्याची टीका ड. आंबेडकरांनी प्रस्थापित नेत्यांवर केली. यावेळी वंचित बहुजन आघाडीचे राज्य उपाध्यक्ष सर्वजित बनसोडे, राज्य उपाध्यक्ष प्रियदर्शी तेलंग, अविनाश भोसिकर, पुणे शहर अध्यक्ष मुन्नवर कुरेशी, ओबीसी संघटनांचे प्रतिनिधी, पदाधिकारी कार्यकर्ते यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**सर्वोच्च न्ययालयाने तडीपार**

शाह हे जेव्हा गुजरातमध्ये होते. तेव्हा त्यांनी कायद्याचा चुकीच्या पद्धतीने वापर केला होता. त्यामुळे सुप्रीम कोर्टाने राज्यातील कायदा व सुव्यवस्था राखली जावी म्हणून त्यांना गुजरातमधून तडीपार केलं होतं. तो माणूस आता देशाचा गृहमंत्री झाला आहे आणि देशाचं संरक्षण करण्याची जबाबदारी घेऊन अशी वक्तव्ये करत आहे.

**अमित शाह काय म्हणाले होते?**: गेल्या आठवड्यात पुण्यात भाजपाच्या प्रदेश कार्यकारिणीची बैठक पार पडली. या बैठकीला अमित शाह यांनी संबोधित केलं. यावेळी त्यांनी भारताच्या राजकारणातील भ्रष्टाचाराचे म्होरके कोण असतील तर शरद पवार आहेत अशी टीका केली होती. महाराष्ट्रातील भ्रष्टाचाराला संस्थात्मक रुप देण्याचे काम हे शरद पवार यांनी केलं, असंही शाह म्हणाले होते. अमित शाह म्हणाले, शरद पवारांची यांची सत्ता येते तेव्हा मराठा आरक्षण जातं. २०१४ ला भाजपा सत्तेत आली, त्यापाठोपाठ मराठा आरक्षण आलं, २०१९ ला शरद पवार सत्तेत आले, पाठोपाठ मराठा आरक्षण गेलं. त्यामुळे आता काय करायचं ते तुम्ही ठरवा. या भाषणात अमित शाह यांनी ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि त्यांच्या पक्षाचा 'औरंगजेब फॅन क्लब' असा उल्लेख करत टोला लगावला होता.

**राज ठाकरे महायुतीबरोबर**

जवळपास २२५ ते २५० जागा लढवणार आहोत. तसंच आज कुणी कितीही मोठ्याने घोषणा दिल्या तरीही तिकिट पक्कं असं समजू नका. कुणी कुठल्याही भ्रमात राहू नका. तसंच मला काही जणांनी सांगितलं की आपला पक्ष काहींना सोडायचा आहे. त्यांना मी रेड कार्पेट घालून देतो, त्यांनी खुशाल पक्ष सोडून जावं. असं राज ठाकरे म्हणाले आहेत. तसंच १ ऑगस्टपासून राज ठाकरेंनी महाराष्ट्राचा दौरा सुरु करणार असल्याचंही म्हटलं आहे. यानंतर महाविकास आघाडीच्या नेत्यांनी राज ठाकरेंवर टीका केली. मात्र शिवसेना आमदार भरत गोगावले यांनी राज ठाकरे आमच्या बरोबर येतील असा विश्वास व्यक्त केला आहे.

**कोमलवाडी ते भोजगाव**

खड्डेच खड्डे पडले असून वाहने चालवणे जिकिरीचे बनले आहे. तसेच नागरिकांना चिखलातून पायी चालणे देखील मुश्किल झाले आहे. दळणवळणासाठी कोमलवाडी ते भोजगाव हा प्रमुख रस्ता असल्यामुळे येथील नागरिकांची नियमित या रस्त्यावर वर्दळ असते, ग्रामपंचायतीच्या कामासाठी, उमापूर येथील बँकेच्या कामासाठी, शेतात जाण्यासाठी तसेच इत्यादी महत्वपूर्ण कामासाठी कोमलवाडी येथील कोमलवाडी येथील नागरिकांना या रस्त्यावरून ये–जा करावी लागते. पावसामुळे रस्त्यावर खड्डे पडले असून ते खड्डे चुकविण्याच्या नादात तसेच गाडी घसरून अनेकवेळा नागरिक पडत आहेत. शेतकऱ्यांना, महिलांना या रस्त्यावरून दररोज मोठी कसरत करावी लागत आहे. यामुळे नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे. या रस्त्यावरून प्रवास करणाऱ्या नागरिकांना जीववित्वाला धोका निर्माण झाला आहे. सध्या पावसाळा सुरू असल्याने या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात चिखलाचे साम्राज्य असून रस्त्यावर मोठ मोठे खड्डे पडले आहे. या रस्त्यावरून प्रवास करताना वाहन चालकांना मोठी कसरत करावी लागत आहे. चिखलामुळे वाहन घसरत आहे. वाहने फसत आहेत, या प्रकारामुळे या रस्त्यावर प्रवास करणारे नागरिक संतप्त झाले आहे. त्यामुळे या रस्त्यावर तात्काळ उपाययोजना करावे आणि गेल्या अनेक वर्षांपासून डांबरापासून वंचित असलेल्या रस्त्याला डांबरीकरण करावे अशी मागणी आता नागरिकांकडून होत आहे.

**गेवराईत ज्ञानराधावर संचालक**

यांनी विचारला आहे. गेवराई तालुक्यात पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करुन घेण्यास टाळाटाळ केली जात असल्याने पूजा मोरे यांच्या नेतृत्वाखाली हलगी बजाओ आंदोलन करण्यात आले होते. त्यावेळी गुन्ह्यात सर्वच खातेदारांना रेकॉर्ड वर घ्या ही मागणी करण्यात आली होती त्यानुसार पोलीस निरीक्षक श्री. प्रवीणकुमार बांगर यांच्या पुढाकाराने मादळमोही येथील संजय लक्ष्मण येवले यांनी दिलेल्या फिर्यादीत अन्य ३०३ खातेदारांच्या नावाची यादी जोडून जिल्ह्यातील आजपर्यंतचा सर्वात मोठा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यामध्ये श्री. संजय येवले यांची स्वतः ची २ लाख ३५ हजार ९०० रकमेसह अन्य ३०३ खातेदार असे एकूण ९ कोटी ३७ लाख ७१ हजार ७४७ रूपयांची फसवणूक झाली आहे. याप्रकरणी अध्यक्ष सुरेश ज्ञानोबा कुटे, उपाध्यक्ष यशवंत कुलकर्णी, वसंत शंकरराव सताळे, आशिष पद्माकर पाटोदेकर, दादाराव हरिदास उंद्रे, वैभव यशवंत कुलकर्णी, कैलास काशिनाथ मोहिते, शिवाजी रामभाऊ पारसकर, रविंद्र मधुकर ताळवे, आशा पदमाकर पाटील, रेखा वंसतराव सताळे, रघुनाथ सखाराम खरसाडे, रविंद्र श्रीरंग यादव या १३ संचालकांसह मादळमोही शाखेचे मॅनेजर सचिन हडतगुगे, कॅशिअर उमेश कोटावळे या १५ जणांविरुध्द गेवराई पोलिस ठाण्यात कलम ४०६, ४०९, ४२०, १२० (बी) भादवीसह कलम ३, ४ एमपीआयईप्रमाणे गुन्हा दाखल झाला असून पुढील तपास सपोनि जंजाळ करीत आहेत. तर दुसरा गुन्हा बीडच्या शिवाजीनगर पोलिस ठाण्यात दाखल झाला आहे. याप्रकरणी अध्यक्ष सुरेश कुटे, अर्चना सुरेश कुटे, उपाध्यक्ष यशवंत कुलकर्णी, आशिष पदमाकर पाटोदकर, वैभव यशवंत कुलकर्णी, जनरल मॅनेजर नारायण सुगंदराव शिंदे, शिवाजी उमाटे, सतिष आणि वामकर या दहा जणांविरुध्द शिवाजीनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून पुढील तपास सपोनि भोरे हे करीत आहेत.

## पान सहा वरून

**रोज झाडाखाली, पाऊस आल्यावर**

वंजारवाडी वस्ती येथे इयत्ता १ ते ५ वी पर्यंतचे वर्ग आहेत.सध्या विद्यार्थी पटसंख्या २३ असुन दोन शिक्षक कार्यरत आहेत.शाळेच्या स्थापनेपासून इमारतीची मागणी होत असताना देखील अद्याप शाळेला ईमारत मिळाली नाही.त्यामुळे विद्यार्थ्यांना कधी झाडाखाली तर कधी गोठ्यात बसुन शिक्षण घ्यावे लागत आहे.शिक्षण विभाग आणखीन किती दिवस या शाळेकडे दुर्लक्ष करणार आहे. असा संतप्त सवाल वंजारवाडी वस्तीवरील विद्यार्थ्यांचे पालक करत आहेत. जोरदार वारा आणि पाऊस आल्यावर विद्यार्थ्यांच्या जिवाला धोका निर्माण होऊ शकतो त्यामुळे पालकांची शाळा इमारतीची मागणी आहे.

**चोरट्यांनी संधी साधून**

भर वस्तीतील घराचा गुरुवारी रात्रीच्या सुमारास कुलुप बंद घराचे मुख्य दरवाजा चे कुलूप तोडून घरात प्रवेश करून घरातील गोदरेज कपाट फोडून त्या कपाटातून सोन्याची पोत अडीच तोळे अंदाजे किंमत दोन लाख पन्नास हजार रु नथनी तीन ग्रॅम अंदाजे किंमत २१ हजार रु सोन्याच्या दोन अंगठी अंदाजे किंमत एक लाख रु,इतर किरकोळ सोन्याच्या वस्तू व रोख रक्कम पन्नास हजार रु असा चार लाख पन्नास हजार रु चा मुद्देमाल चोरून अज्ञात चोरटे पसार झाले आहे दरम्यान माजी सभापती चंद्रकांत पाटील यांनी रात्री उशिरा सोयगाव पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात चार ते पाच जणांविरुद्ध घरफोडी चा गुन्हा दाखल करण्यात आला होता दरम्यान शनिवारी छत्रपती संभाजीनगर येथून डॉग स्कोड घटनास्थळी पाचारण करण्यात येणार आहे पोलीस निरीक्षक पंकज बारवाल यांचेसह उपनिरीक्षक रजाक हुसेन शेख जमादार राजू बर्डे रवींद्र तायडे विकास दुबिले दिलीप पवार गजानन दांडगे आदी रात्रभर घोसला गावात ठाण मांडून होते

**लाडकी बहीणसाठी तेरा**

अधिकारी दीपक म्हेत्रे यांनी दिल्या आहे दरम्यान शुक्रवार पासून महसूल व बाल विकास प्रकल्प विभागाने अर्ज नोंदणी साठी तीन दिवस शिबिर आयोजित केली आहे मात्र पंचायत विभाग या योजनेपासून दूरच आहे सोयगाव तालुक्यातील १५० अंगणवाडीत मधील १३५ सेविका आणि मदतनीस यांनीच तेरा हजार एक महिलांची ऑनलाइन व सात हजार ७९० महिलांच्या ऑफ लाईन संचिका जमा केलेल्या आहे त्यामुळे सोयगाव तालुक्यात लाडकी बहीण योजनेचा पात्र अपात्र आकडेवारी काढण्याची प्रक्रिया एक आगस्ट पासून हाती घेण्यात येईल त्यामुळे आता सोयगाव तालुक्यातील पात्र ठरलेल्या महिलांवर मुख्यमंत्रीची लाडकी बहीण म्हणून शिक्कामोर्तब होणार आहे

**शासनाच्या उपक्रमासाठी**

यासाठी नेहमीच स्पर्धा परीक्षा घेऊन गुणवंताचा बक्षीस देऊन सत्कार केला जातो. महिलांसाठी देखील या वाचनालयाच्या माध्यमातून नेहमीच उपक्रम राबवले जातात. सध्या शासनाने राज्यातील सर्व शाळांमध्ये २२ जुलै २०२४ पासून महा वाचन उत्सव सुरु केला आहे. त्या अनुषंगाने छत्रपती शाहू महाराज सार्वजनिक वाचनालय प्रशासनाने तात्काळ बैठक घेऊन शासनाच्या या उपक्रमामध्ये सक्रिय सहभाग घेण्याचा निर्णय घेतला आहे. त्या निर्णयानुसार वाचनालयाच्या वतीने पिंपरखेड आणि परिसरातील सर्व शालेय विद्यार्थ्यांना सहकार्य करण्याचे काम हाती घेतले आहे. त्यात शालेय विद्यार्थ्यांना अभ्यासाव्यतिरिक्त ग्रंथ, कथा , कादंबऱ्या, स्पर्धा परीक्षा विषयी आवश्यक असणारे वाचन साहित्य उपलब्ध करून दिले जात आहे. या उपक्रमाचा लाभ सर्व विद्यार्थ्यांनी घ्यावा असे आवाहन वाचनालयाच्या ग्रंथपाल सौ. शिलाताई उजगरे यांनी केले आहे.

**माजलगाव विधानसभेचे वातावरण**

निवडणुकीत माजलगाव मतदार संघातील सर्व प्रस्थापित पुढारी भाजपच्या बाजूने असताना, महाविकास आघाडीच्या खा.बजरंग बप्पा सोनवणे यांना माजलगाव मतदार संघातून चांगले मताधिक्य मिळवून देण्यासाठी गावा– गावात–वाडी–वस्तीत जाऊन केंद्र शासनाच्या शेतकरी विरोधी धोरणाचा पर्दापाश करण्यात त्यांचा मोलाचा वाटा आहे, तसेच आगामी काळात शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नाला वाचा फोडण्यासाठी तसेच माजलगाव मतदार संघातील शेकडो प्रलंबित प्रश्नांवर आवाज उठवण्यासाठी शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई ड नारायण गोले पाटील यांच्यासारख्या तरुण तडफदार, प्रमाणिक नेतृत्वाची गरज आहे त्यामूळे महाविकास आघाडीचे नेते मा. शरदचंद्रजी पवार साहेब, मा. उद्धवजी ठाकरे साहेब, मा. नाना पटोले साहेब, भाई जयंत पाटील साहेब यांनी भाई ड. नारायण गोले पाटील यांच्यासारख्या शेतकरी कुटुंबातील लढवय्या नेत्यास माजलगाव विधानसभेची उमेदवारी द्यावी असे आवाहन प्रसिद्धी पत्रकाद्वारे भाई गणपतराव कोळपे यांनी केले असून लवकरच शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई जयंत पाटील यांना भाई मोहन गुंड यांच्या नेतृत्वाखाली माजलगाव मतदार संघातील शेतकरी कामगार पक्षाचे शिष्ट मंडळ भेटून मागणी करणार आहे तसेच बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग बप्पा सोनवणे, शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई मोहन गुंड व माजलगाव मतदार संघातील शेतकरी कामगार पक्षाचे शिष्ट मंडळ यांची महाविकास आघाडीने शेतकरी कामगार पक्षाला माजलगाव मतदार संघ सोडण्याबाबत संयुक्त बैठक होणार असल्याची माहिती भाई गणपतराव कोळपे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

**बीडमध्ये तायक्कांदो खेळासाठी**

तायक्कांदोच्या राज्य स्पर्धेसाठी हॉलच्या दुरुस्तीसाठीही त्यांनी मदत केली. त्याचप्रमाणे एक अत्याधुनिक हॉलही त्यांनी द्यावा अशी मागणी यानिमित्ताने मी करतो, या मागणीचा योगेशदादा नक्कीच विचार करतील, असे कोटेचा म्हाणाले. आरटीओ अधिकारी स्वप्नील माने म्हणाले, आजचा दिवस अभिमानास्पद असाच आहे, कारण बीडमध्ये राज्य स्पर्धा होत आहे. शहरातून अनेक खेळाडू घडलेले आहेत. परंतु, इतर जिल्ह्यातील खेळाडूंचा खेळ पाहण्याची संधी बीडकरांना मिळाली आहे. इथे आलेले खेळाडू भविष्यात देशाचे प्रतिनिधीत्त्व करतील यात शंका नाही. आता खेळ हा एक शिक्षणाचा भाग बनला आहे. अनेक पालक आपल्या मुलांना खेळाकडे वळाले आहेत. खेळालाही महत्त्व प्राप्त झाले आहे. यावेळी जिल्हा संघटनेचे अध्यक्ष नितीनचंद्र कोटेचा, राज्य संघटनेचे महासचिव मिलिंद पठारे, खजीनदार व्यंकटेश कर्रा, शिवछत्रपती पुरस्कार विजेते प्रवीण बोरसे, उपाध्यक्ष दुलिचंद मेश्राम, पोलिस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ, राजेश महाजन, विनायक ऐनापुरे, नवगण शिक्षण संस्थेचे संचालक आमेर सिद्दीकी, जयश्री बारगजे, प्रा.तानाजी आगळे, संतोष बारगजे, डॉ.विनोद पवार, राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष शुभम कातांगळे, प्रा.शेख शकील आदी व्यासपीठावर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मिलिंद शिवनीकर, प्रास्ताविक डॉ.अविनाश बागरजे यांनी केले. डॉ.शकील शेख यांनी आभार मानले.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी–०२४४२–२९९०८४,ई–मेल–beedpunyabhumi@gmail.com
Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

# सोयगाव पुरवठा विभागात सावळा गोंधळ

**दुर्लक्षित** | **नागरिकांची कामे होईना**

सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

सोयगाव तहसीलच्या पुरवठा विभागात नागरिकांची गर्दी वाढली असून शिधापत्रिका ऑनलाइन करण्यासाठी नागरिकांना सोयगाव तहसील च्या पायऱ्या झिजवव्या लागत आहे शेकडो कागदपत्र असलेली संचिका घेऊन आलेल्या लाभार्थ्यांची शिधापत्रिका ऑनलाइन होत नसल्याने नागरिकांना रिकाम्या हाताने परत जावे लागत आहे

सोयगाव तालुक्यत सध्या शिधापत्रिका ऑनलाइन करणे नवीन कुटुंबातील नावे शिधापत्रिका मध्ये समाविष्ट करणे नावे काढणे व नवीन शिधापत्रिका साठी सोयगाव तहसील कार्यालयात गर्दी झाली आहे तीन दिवसापासून नागरिक या कामांसाठी सोयगावला येत आहे परंतु सोयगाव तहसील कार्यालयात कामेच होत नसल्याचे प्रकार उघडकीस येत आहे त्यासाठी मंगळवारी भाजपचे वतीने इंद्रिस मुलतानी सुरेश बनकर व ज्ञानेश्वर मोठे यांनी सोयगाव तहसील च्या पूरवठा विभागाची झाडाझडती घेत तहसीलदार मनीषा मेने यांची भेट घेतली परंतु तरीही परिस्थिती जैसे थे आहे मंगळवारी तहसीलदार मनीषा मेने यांनी भाजपचे शिष्टमंडळाला कारवाई करण्याचे आश्वासन दिले व पुरवठा अधिकारी नाना मोरे यांचा शिधापत्रिका च्या कामातून अधिकार काढून घेतला असल्याचे सांगितले होते परंतु बुधवार व गुरुवार हा पुरवठा अधिकारी सर्रासपणे शिधापत्रिका च्या कामांवर स्वाक्षरी करत आहे जिल्हापुरवठा अधिकारी या सोयगाव च्या तालुका पुरवठा अधिकाऱ्यावर कोणतीही कारवाई करत नाही त्यामुळे गोंधळ वाढला आहे.



### त्या पुरवठा अधिकाऱ्याला कारणे दाखवा

सोयगाव तहसील च्या मनमानी करणाऱ्या त्या तालुका पुरवठा अधिकारी नाना मोरे यांना बुधवरी विविध तक्रारींच्या अनुषंगाने कारणे दाखवा बजावली आहे त्यांचा अधिकारही काढला आहे त्यामुळे शिधापत्रिका वर आता त्या पुरवठा अधिकाऱ्याची स्वाक्षरी नसेल। असे तहसीलदार मनीषा मेने यांनी सांगितले

### कुटुंबातील सदस्यांचे ऑनलाइन नावे होईना

सोयगाव तालुक्यात प्राधान्य कुटुंब, अंत्योदय शेतकरी व अंध अपंग आदी योजनेतील शिधापत्रिका धारकांची ऑनलाइन नावे समाविष्ट नसून त्यामुळे शिधापत्रिका तर दूरच परंतु शिधा ही मिळत नाही त्यामुळे लाभार्थ्यांना शिधापत्रिका असूनही ऑनलाइन अभावी गोंधळ उडाला आहे नवीन शिधापत्रिका ही मिळत नाहीत त्यामुळे धान्यसाठी सर्वसामान्यांची धावपळ झाली आहे.

# मंदिराकडे जाणारा रस्ता झाला चिखलमय

सवाल : लोकप्रतिनिधींना फक्त मतदांनच हवे का?



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड शहरातील बार्शी रोड लगत भगवान बाबा प्रतिष्ठान, पिताजी आनंद,पिताजी विवेक अपार्टमेंट भगवान या भागातील भागातील रस्त्याची अवस्था ही खेड्यापेक्षाही बिकट असल्याचे दिसून येत आहे. स्थानिक नागरिकांना विद्यार्थ्यांना व मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या भावी भक्तांना चिखलातून मार्ग काढावा लागत असल्याने संताप व्यक्त होत आहे.या भागात भगवान बाबा चे मंदिर असून,बऱ्याच पालख्या याच मंदिरात मुक्कामी असतात.तसेच कीर्तन,भजन हे या मंदिरात होत असते.दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी शहरातून मुक्ताई पालखीचे आगमन झाले,भगवान बाबा मंदिरात भाविक भक्त व वारकरी हें पादुका घेऊन जात असताना चिखलात पाय फसून वारकरी घसरून पडण्याची वेळ वारकऱ्यावर आली होती,डोक्यावर पादुका असल्यामुळे हें वारकरी स्वतः सावरून कशेबशे मंदिरात पोहचले.या मंदिराकडे जाणारा रस्ता अनेक वर्षापासून दुर्लक्षित आहे.लोकप्रतिनिधींना आपल्या कर्तव्याचा विसर पडत असून फक्त मतदान हवे का?असा प्रश्न पडत आहे. वारंवार मागणी करून देखील नगरसेवक,आमदार व खासदार यानी या भागातील रस्ता करून दिला नसल्याने या भागातील नागरिकांनी मतदानावर बहिष्कार घालण्याचा निर्णय घेतला असून,या बाबद बीड जिल्हाधीकारी यांना भेटून या परिसरातिल सिमेंट रस्ते लवकर करून द्यावे म्हणून निवेदन देणार आहेत.शहरातील जवळजवळ सर्वच रस्ते होत असताना फक्त भगवान बाबा मंदिराकडे जाणारा रस्ताच का दुर्लक्षित होत आहे असा प्रश्न भाविक भक्त व परिसरातील नागरिकांना पडला आहे.हा रस्ता मंजूर असल्याची माहिती मिळत असून प्रत्यक्षात कामास मात्र सुरुवात झाली नाही. कमीत कमी लोकप्रतिनिधींनी मुरूम टाकून द्यावा अशी असे मागणी होत आहे.हा रस्ता लवकरात लवकर करून द्यावा अन्यथा या भागातील सर्व नागरिक हे त्यांना नगरपालिका विधानसभा मतदानावर बहिष्कार घालणार असल्याचे बोलले जात आहे.

# बांधकाम कामगाराची आर्थिक लूट

दत्ता वाकसे: ऑनलाईन नोदणी करिता खाजगी दलालाची फौज

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

राज्य शासनाकडून संपूर्ण राज्यातील मजूर वइमारत बांधकाम कामगारांसाठी त्यांना पूर्ण सशक्त व आर्थिक प्रगती व्हावी यासाठी मजूर इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची स्थापना केली आहे. या मंडळांतर्गत जिल्ह्यात बांधकाम मंजूर यांची ऑनलाईन नोदणी करिता खाजगी दलालाची फौज फिरून बांधकाम कामगाराची नोंद करून देतो यासाठी चिरीमिरी घेऊन बांधकाम मंजूर लाभार्थ्यांची लूट करीत असल्याचा आरोप शेफर्ड इंडिया इंटरनॅशनल संघटनेचे व्हाईस प्रेसिडेंट दत्ता वाकसे यांनी केला आहे. महाराष्ट्र राज्यात राज्य सरकारकडून बांधकाम कामगार व इत्तर कामगारासाठी राज्य शासनाकडून मजुरी इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची स्थापना केली आहे. या कल्याणकारी मंडळांतर्गत नोंदणीकृल मजुरासाठी शासनाकडून अनेक अनुदान तत्त्वावर योजना राबविल्या जातात त्यामध्यो मजुराच्या पाल्यांना शिक्षणासाठी व उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती दिल्या जाते तर मजूर आहे त्या ठिकाणी काम करीत असलेल्या ठिकाणी शासनाकडून मध्याह भोजन देण्यात येते. तसेच मजुरांना



कामासाठी लागणारी सुरक्षा किट व महिलांना स्वयंपाक घरात लागणारे स्टील भांडे व तसेच मजुराच्या मुला मुलीच्या लग्नासाठी आर्थिक अनुदान व मजुरांचे कामावर आलेले अपंगत्व व तसेच कायम अपंगत्व यासाठी सुद्धा मोठ्या प्रमाणात आर्थिक लाभ देण्यात येतो. तसेच प्रत्येक नोंदणीकृत लाभार्थ्यांचा अधिकृत कौटुंबिक विमा राज्य शासनाकडून काढला जात आहे. लाभार्थी पती-पत्नी पैकी कुणाचेही एकाचे निधन झाल्यास त्यांच्या अंत्यविधीसाठी सुद्धा आर्थिक सहाय्य राज्य शासन करते कौटुंबिक आरोग्यासाठी सुद्धा शासन आर्थिक मदत अनुदान तत्त्वावर करत असते यासह इतर नोंदणी बांधकाम मजूर कल्याणासाठी अनेक योजना राज्य शासनाकडून अनुदान तत्त्वावर राबविल्या जात आहेत. परंतु बीड जिल्ह्यातील प्रत्येक गावात या योजनेचा लाभ लवकर मिळून देतो व तुम्हाला कुठेही जाण्याची गरज नाही अशी बतावणी केल्या जात असल्याचे दलाकडून सांगण्यात येत आहे. नवीन बांधकाम मजूर नोंदणी करण्यासाठी लाभार्थ्याकडून मोठ्या प्रमाणात खाजगी दलाल आर्थिक लूट करीत आहेत. बीड जिल्ह्यातील संपूर्ण गावात अनधिकृत कार्यालयात झालेले दलालाचे जाळे कायम असून या जाळ्यात भोळ्या भाबड्या लाभार्थ्यांना फसवून लाखो रुपयाची मलिदा लुटणारे दलाल मंडळी कार्यरत आहे अशा दलाला विरुद्ध कारवाई करण्याची मागणी शेफर्ड इंडिया इंटरनॅशनल संघटनेचे व्हॉइस प्रेसिडेंट दत्ता वाकसे यांनी केले आहे.

# बाबूराव चौकटे यांचे निधन

गेवराई/पुण्यभूमी प्रतिनिधी



शहरातील नाईक नगर भागातील रहिवासी बाबूराव रामदास चौकटे वय ७५ यांचे अल्पशा आजाराने सोमवार रोजी रात्री ११ वाजण्याच्या च्या सुमारास दुखत निधन झाले.ते गेल्या काही महिन्या पासुन आजारी होते.त्यातच त्यांचे निधन झाले. त्यांच्यावर मंगळवार रोजी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास शहरातील चिंतेश्वर स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्याच्या पश्चात पत्नी भाऊ भावजई एक मुलगा , पुतण्या ,सुना, नातवंडे असा परिवार आहे.येथील गेवराई आगारातील वाहक जयदीप चौकटे यांचे वडील होत. तर पत्रकार गजानन चौकटे यांचे चुलते होत.

# विभागीय लोकशाही दिनाचे आयोजन

औरंगाबाद/पुण्यभूमी प्रतिनिधी

विभागीय स्तरावरील लोकशाही दिनाचे ऑगस्ट महिन्याच्या दुसऱ्या सोमवारी १२ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी ११ वाजता विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजन करण्यात आले आहे. तसेच नियमित विभागीय लोकशाही दिन संपल्यानंतर विभागीय माहिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे.

तक्रार करण्यासाठीचे अर्ज विहित मुदतीत नमुना प्रप्रत्र-१ (क) मध्ये दोन प्रतीत आवश्यक त्या कागदपत्रासह विभागीय आयुक्त कार्यालयाचे आवक शाखा प्रमुख (नायब तहसीलदार) यांच्याकडे स्विकारण्यात येणार आहेत. विहित नमुना अर्ज प्रप्रत्र-१ (क) आवक शाखेत उपलब्ध करून देण्यात आला आहे. विभागीय महिला लोकशाही दिनासाठी पिडीत महिलांनी विहीत नमुन्यातील मुदत पुर्व अर्ज विभागीय उप आयुक्त, महिला व बाल विकास, खोकडपुरा औरंगाबाद तथा सदस्य सचिव यांच्याकडे सादर करावेत. अर्जाच्या दोन प्रती विभागीय लोकशाही दिनाच्या दिवशी विभागीय आयुक्त यांच्याकडे समक्ष पुन्हा सादर कराव्यात. तसेच ज्यांनी यापुर्वीच्या विभागीय स्तरावरील लोकशाही दिनी तक्रार अर्ज दिलेले असतील परंतू त्यांचे प्रकरणात अद्याप कार्यवाही झाली नाही, अशा प्रकरणात त्यांना पुन्हा अर्ज देता येणार नाही. जिल्हास्तरावरील लोकशाही दिन कार्यक्रमात ज्या प्रश्नांची सोडवणूक होवू शकली नाही किंवा या प्रश्नाबाबत जिल्हास्तरीय लोकशाही दिनांत तक्रारदाराचे समाधान झाले नाही, असे सर्व प्रश्न विभागीय स्तरावरील लोकशाही दिनामध्ये घेण्यात येणार आहेत, असे विभागीय आयुक्त कार्यालयाने प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळविले आहे.

## वाढदिवस




बीड : :चार हजार वृक्षांच्या माध्यमातून पंकजा मुंडे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

**नियोजन** | **डॉ.योगेश, सारिका क्षीरसागरांचा उपक्रम**

# बीडमध्ये मोफत आरोग्य शिबिर

बीड /पुण्यभूमी प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार यांच्या वाढदिवसानिमित्त आणि कृषिमंत्री तथा पालकमंत्री ना.धनंजय मुंडे मार्गदर्शनाखाली मोफत आरोग्य शिबिराचे शहरातील सौ. के.एस.के. महाविद्यालयाच्या सभागृहात आज (दि.२७) सकाळी १० ते ५ या वेळेत आयोजन करण्यात आले आहे. हा उपक्रम पक्षाचे बीड विधानसभेचे अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर, डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांच्या पुढाकारातून राबविण्यात येत आहे.

आरोग्य शिबिरात येणाऱ्या रुग्णांची ब्लड प्रेशर, शुगर, हृदय, ईसीजी तपासणी करण्यात येणार आहे. यावेळी ठराविक औषधे मोफत दिली जातील. डोळे तपासणी होईल, त्यानंतर अल्प दरात चष्मे उपलब्ध करून दिले जातील. स्त्रियांच्या विविध आजारावर निदान करण्यासाठी तज्ञ डॉक्टर असणार आहेत. डॉक्टरांच्या सल्लयानुसार हृदयाची अँजिओग्राफी, कॅन्सर शस्त्रक्रिया, अँजिओप्लास्टी, तिरळेपणाच्या शस्त्रक्रिया, मूत्रमार्ग शस्त्रक्रिया, गर्भ पिशवी दुरुस्ती, डायलिसिस, हर्निया शस्त्रक्रिया, डोळ्याच्या सफेद पडद्याची शस्त्रक्रिया, हाडांचे फॅक्चर, बायपास, कानाच्या पडद्याची शस्त्रक्रिया, हृदयाला असलेले छिद्र, मणक्याच्या शस्त्रक्रिया, मोतीबिंदू, छाती आणि पोटाची शस्त्रक्रिया, व्हॉल्व रीप्लेसमेंट आदी शस्त्रक्रिया सर्व सोयीसुविधायुक्त नामांकित रुग्णालयांमध्ये मोफत करून देण्यात येणार आहेत. यामुळे बीड विधानसभा मतदारसंघातील रुग्णांनी आरोग्य शिबिराचा मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर, डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी केले आहे.





### लॅसिक शस्त्रक्रियेसाठी नोंदणी

बीडमध्ये डॉ.योगेश व डॉ.सारिका क्षीरसागर यांच्या पुढाकारातून कृषिमंत्री तथा पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त चष्मा असलेल्या रुग्णांवर 'लॅसिक' नामक मोफत शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन केले होते. यात अडीचशेहुन अधिक नेत्र रुग्णांनी नोंदणी केली असून त्यांच्यावर लवकरच नामांकित रुग्णालयामध्ये शस्त्रक्रिया होणार आहेत. यामुळे रुग्णांना परत चष्मा लावण्याची गरज भासणार नसून डॉक्टर क्षीरसागर दाम्पत्याचे हे शिबिर दूर'दृष्टी' उपक्रम ठरले आहे.

# उत्कृष्ट सौंदर्यशास्त्र तज्ज्ञ पुरस्काराने सन्मान!



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

येथील सौंदर्यशास्त्र, त्वचारोग व केश सौंदर्यशास्त्र तज्ज्ञ डॉ. शिशीर खोसे यांचा उत्कृष्ट उदयन्मोख सौंदर्यशास्त्र तज्ज्ञ पुरस्काराने सन्मान करण्यात आला. राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने विविध क्षेत्रातील वैद्यकीय तज्ज्ञांचा गौरव करण्यात आला.

अतिरिक्त जिल्हा शल्यचिकीत्सक डॉ. नागेश चव्हाण, बालहक्क आयोगाच्या सदस्य व राष्ट्रवादी महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष ॲड. प्रज्ञा खोसरे, कल्पतरुच्या सचिव डॉ. सारिका क्षीरसागर, युवती आघाडीच्या अध्यक्ष प्रिया डोईफोडे, वैद्यकीय आघाडीचे जिल्हाध्यक्ष डॉ. रमेश शिंदे यांच्या हस्ते डॉ. शिशीर खोसे यांचा सन्मानचिन्ह, मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. पद्मांजली स्किन केअर हॉस्पीटलचे डॉ. खोसे यांनी सौंदर्याच्या समस्यांसह कुष्ठरोगांच्या दुर्धर रुग्णांवरही यशस्वी उपचार केले आहेत. त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांचा सन्मान करण्यात आला. या सन्मानाबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# कस्तुरी

## हस्तकलेचं क्षेत्र

करिअरकट्टा



हस्तकलेचं आणि आपलं वर्षानुवर्षांचं अगदी परंपरागत नातं आहे. आणि आता तर आपल्यातल्या कुणाला खरोखर हस्तकलेची आवड असेल, या कलेसोबतचं नातं दृढ करायचं असेल, तर अलीकडच्या काळात अभ्यास आणि करिअरच्या वेगवेगळ्या संधीही या क्षेत्रात निर्माण झाल्या आहेत. बारावीची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतरही या क्षेत्रात आपलं कौशल्य आजमावायला सुरुवात करता येऊ शकते. चार वर्षांचा क्राफ्ट डिझाईनचा पदवी अभ्यासक्रम आता उपलब्ध आहे. या अभ्यासक्रमात कौशल्य आणि उपयोजन, कला आणि अभिकल्प, हस्तकलेचा इतिहास, हस्तकलेसाठी आवश्यक असणारं साहित्य, साधनं, तंत्रज्ञान आणि प्रक्रिया, डिझाईनपद्धती आणि प्रक्रिया, ग्राहक आणि बाजाराच्या गरजा अशा विविध विषयांचा अभ्यास केला जातो. हस्तकला क्षेत्रातला अधिक सखोल अभ्यास करण्याची इच्छा असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी क्राफ्ट डिझाईन या क्षेत्रामधली मास्टर्स डिग्री देऊ करणारा, दोन वर्षे कालावधीचा अभ्यासक्रम उपलब्ध आहे. बॅचलर ऑफ डिझाईन, बॅचलर ऑफ आर्किटेक्चर, बीए डिझाईन, बीएससी डिझाईन, बॅचलर ऑफ व्होकेशन इन डिझाईन अशापैकी कोणताही अभ्यासक्रम पूर्ण केला असेल, तर त्या पदवीनंतर पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेता येऊ शकतो. स्पेशलायझेशन करताना सॉफ्ट मटेरियल ॲप्लिकेशन, हार्ड मटेरियल ॲप्लिकेशन, फायर मटेरियल ॲप्लिकेशन, फॅशन डिझाईन असे नानाविध पर्याय उपलब्ध आहेत. आपल्यातल्या अंगभूत आवडीला किंवा कलागुणाला छंदापुरतं मर्यादित न ठेवता, घरगुती चौकटीत न अडकवता नवी क्षितिजं धुंडाळायची असतील, तर अशा पर्यायांचा विचार जरूर करायला हवा.

## लेकरांशी संवाद

करून तर पाहा!



आपल्या लेकरांशी आपण बोलत नाही असं नाही; पण संवेदनशील किंवा गुंतागुंतीच्या विषयांवर आपण किती बोलतो याचा विचार करून पाहा. असं बोलणं आपण टाळतो, हे विचार केल्यावर आपल्यातल्या बऱ्याच जणांच्या लक्षात येईल. पुढे असे काही महत्त्वाचे मुद्दे नोंदवलेले आहेत, जे पालकांनी मुला-मुलींशी बोलायला हवेत. पुढे नोंदवलेल्या गोष्टी मुलांना माहीत असायला हव्यात आणि सुज्ञ पालक या नात्याने आपण आपल्या लेकरांना त्या सांगायला हव्यात.

आपल्या शरीरावर फक्त आपला अधिकार आहे. आपलं शरीर हे फक्त आणि फक्त आपल्या मालकीचं आहे. त्याला इजा करण्याचा अधिकार कुणालाही नाही.

लहान असताना अंघोळीसाठी कुणा मोठ्या माणसाने मदत करणं किंवा आजारपणात डॉक्टरांनी केलेला स्पर्श चालू शकतो. एरवी आपल्या कपड्याने झाकल्या जाणाऱ्या अंगाला कोणी स्पर्श करू पाहिलं, तर ते योग्य नाही.

एखाद्याच्या स्पर्शाचा राग आला किंवा विचित्र वाटलं, तर लगेचच आपुलकीच्या, विश्वासातल्या माणसाला जाऊन सांगितलं पाहिजे.

कुणीही स्पर्शाचे नियम तोडून म्हणेल, 'हे आपलं-तुपलं गुपित आहे. कुणाला सांगायचं नाही' तरीसुद्धा विश्वासातल्या माणसाला ते नक्की सांगायला हवं. हवी ती मदत मिळेपर्यंत सांगत राहणं गरजेचं आहे. आपल्याला आवडणार नाही, भीती वाटेल असा कुणी स्पर्श केला तर जोरात ओरडायचं... 'नाही! नको! नाही!' स्पष्ट नकार देणं खूप महत्त्वाचं असतं. कधी खाऊ/भेटवस्तू देऊन त्या बदल्यात काही लोकं आपल्याला त्रास होईल असं वागतात, बोलतात, स्पर्श करतात. त्यांचं मुळीच ऐकायचं नाही. भेटवस्तू घ्यायची नाही.

आपण काळजी घेऊनही काही घडलंच तर यात आपली चूक नाही. स्पर्शाचे नियम तोडून कुणी इजा केली तरीही 'नाही, नको' म्हणू शकलो नाही तरीही, तिथून निघून जाणं जमलं नाही तरीही; जे घडलं ते आपल्याला हवं होतं असा अर्थ मुळीच होत नाही. पण 'नाही, नको' म्हणता यायला हवं. त्याचा सराव करायला हवा. आपण महत्त्वाचे आहोतच आणि आपण सुरक्षित असणं आणखी महत्त्वाचं आहे.

## अधिकारावर शिक्कामोर्तब

माहीत आहे?



बऱ्याचदा असं दिसतं की, सर्वसामान्य महिलांना आपल्या हक्कांची, अधिकारांची माहिती आणि जाणीव असतेच असं नाही. भारतीय संविधानाने आणि कायद्याने महिलांच्या अनेक अधिकारांवर शिक्कामोर्तब केलं आहे, हे खरं तर प्रत्येक मुलीने, महिलेने समजून घेतलं पाहिजे. आपल्याला हे ठाऊक आहे का, की हिंदू वारसा हक्क कायद्याने विधवा महिलेला पतीच्या वडिलोपार्जित संपत्तीमधे मुलांच्या बरोबरीने अधिकार मिळतो. तसंच पतीच्या स्वतंत्र संपत्तीमध्ये, त्याने मृत्युपत्र केलं नसल्यास, मुलं आणि सासू यांच्या बरोबरीने हक्क मिळतो; परंतु प्रत्यक्षात मात्र अनेकदा विधवा महिलांच्या नावावर जमीन करून देण्यास कुटुंबाचा विरोध असल्याचं दिसून येतं. विशेषतः महिलेचं वय कमी असेल, मुलं लहान असतील किंवा मुलगा नसेल, तर अशा वेळी त्यांना त्यांच्या नवऱ्याच्या जमिनीमधील हक्कापासून वंचित केलं जाण्याची शक्यता अधिक असते. पतीच्या मृत्यूच्या वेळी त्याच्या वडिलांच्या जमिनीच्या वाटण्या होऊन त्याचा हिस्सा त्याला मिळाला असेल, तर त्याच्या मृत्यूनंतर विधवा पत्नीला त्यावर हक्क मिळवणं तुलनेने सोपं जातं. मात्र, जमिनीच्या वाटण्या झालेल्या नसतील आणि पतीच्या मृत्यूवेळी जमीन सासऱ्यांच्या नावे असेल, तर त्यामध्ये अधिकार मिळवणं कठीण असतं. अनेकदा तर असं दिसून येतं की, तिला हिस्सा द्यायला लागू नये यासाठी तिला घराबाहेर काढलं जातं. कायद्याने अशा केसमधे सासऱ्यांच्या जमिनीची वाटणी करून मागण्याचा हक्क तिला असला तरी त्यासाठीची प्रक्रिया सोपी नाही. तसंच असं केल्यास कुटुंबाकडून कशा प्रकारचा आणि किती विरोध सहन करावा लागेल, याची कल्पनाही करू नये इतपत परिस्थिती अवघडलेली बनते, असं सर्वसाधारणपणे दिसून येतं. अर्थात, या महिलांना येणाऱ्या अडचणी केवळ कुटुंबाच्या विरोधापुरत्या मर्यादित नाहीत. वारसनोंद कशी करायची याबद्दल माहिती नसणं, नोंदी होण्यामध्ये येणाऱ्या अडचणी, शासकीय अधिकाऱ्यांकडून अडवणूक, अतिरिक्त पैशांची मागणी अशा अनेक समस्या अशा महिलांना येतात. म्हणूनच कमीत कमी समस्या याव्यात किंवा जर आल्याच, तर त्या नीट हाताळता याव्यात यासाठी आपल्या हक्कांची पक्की जाणीव आणि त्या न्याय्य हक्कांसाठी उभं राहण्याची ताकद महत्त्वाची ठरते.

## पालकाचे उपयोग

पोषणतत्त्व



पालेभाज्या फारशा कुणाला आवडत नाहीत आणि 'जेवणाला काय आहे?' असं विचारल्यावर मेथी, अळू, शेपू, माठ, चुका, चाकवत, अंबाडी, पालक असं काही उत्तर मिळालं की, आपल्यातल्या अनेकांचे चेहरे पडतात किंवा त्यांचा मूड जातो. पण आपल्या आवडी-निवडी थोडावेळ बाजूला ठेवल्या आणि आहारशास्त्र समजून घेतलं, तर आपल्या लक्षात येईल की, पालेभाजीचं आपल्या आहारामध्ये महत्त्वाचं स्थान आहे. शरीराच्या वाढीसाठी, हृदयाच्या सक्षमतेसाठी, हाडांच्या आरोग्यासाठी, पचनक्रिया, रक्तदाब नियंत्रणासाठी, वाढवण्यासाठी, संतुलित डोळ्यांच्या आरोग्यासाठी पालेभाज्या, सुधारण्यासाठी, रोगप्रतिकारशक्ती रक्तप्रवाहासाठी तसंच अत्यंत उपयुक्त आहेत. त्यातही पालकाचा जर विचार केला तर या पालेभाजीमध्ये कॅलरीज कमी असतात आणि मोठ्या प्रमाणात पोषणतत्त्वांचा साठा असतो. कॅल्शियम, मॅग्नेशियम, लोह यासोबतच 'ए' आणि 'सी' व्हिटॅमीनदेखील या भाजीत आढळून येतं. आहारात नियमितपणे पालकाचा समावेश केला, तर रक्तातलं साखरेचं प्रमाण नियंत्रित राहतं. हिमोग्लोबिनचं प्रमाण वाढतं आणि मधुमेहासारखी समस्या दूर ठेवण्यासाठी शरीर सक्षम बनतं. पालकाच्या साधारत: शंभर ग्रॅम पानांमध्ये सुमारे नव्याण्णव मिलीग्रॅम कॅल्शियम असतं. मज्जासंस्था, हृदय आणि स्नायूंसाठी ते उपकारक ठरतं. पालकामध्ये भरपूर प्रमाणात ॲंटिऑक्सिडंट असतात. ती शरीर सक्षम आणि सुदृढ राखण्यासाठी महत्त्वाची मानली जातात. पालकातल्या भरपूर नायट्रेटमुळे हृदय संतुलित व निरोगी राहतं. पालकामध्ये पोटॅशियम भरपूर असतं आणि सोडियमचं प्रमाण कमी असतं. त्यामुळे रक्तदाबाशी संबंधित त्रास असलेल्या व्यक्तींना पालक खाण्याचा सल्ला मिळतो. पालकामध्ये भरपूर प्रमाणात असणारं फोलेट लाल रक्तपेशी वाढवण्यासाठी आवश्यक मानलं जातं. शरीरात लाल रक्तपेशींची कमतरता म्हणजेच ॲनिमियाचा त्रास. आपल्यातल्या अनेक महिला ॲनिमिक असतात, अशक्त असतात. पालक खाल्ल्याने ॲनिमियाचा धोका टाळता येण्याची शक्यता वाढते, हे आपण आवर्जून लक्षात ठेवलं पाहिजे. मुख्य म्हणजे पालकाची पानं फायबर आणि पाण्याने समृद्ध असतात. फायबर म्हणजे तंतुमय घटक आपल्या शरीरातली पचनयंत्रणा व्यवस्थित कार्यरत ठेवण्याच्या कामी येतात. अपचन, गॅसेस यांसारख्या समस्या दूर ठेवून पचनसंस्था सुरळीत चालावी म्हणून पालकाचा आहारात समावेश करणं इष्ट ठरतं.

## पावसाळ्यातील फ्रीजची देखभाल

यंत्रमंत्र



पाऊस जसा आनंदाचा, उत्साहाचा विषय तसाच यंत्रांच्या, उपकरणांच्या दृष्टीने तो काळजीचा; म्हणजे खरं तर काळजी घेण्याचा काळ. हवेतला ओलावा, आर्द्रता या ऋतूत वाढते. त्यामुळे कोणत्याही प्रकारचा धोका, अपघात टाळण्याच्या दृष्टीने पावसाळ्यात सर्वात महत्त्वाची दक्षता घ्यावी लागते, ती खास करून विजेवर चालणाऱ्या तुलनेने अवजड आणि महाग उपकरणांबाबत!

तसं पाहिलं तर पंखा, एसी, रेफ्रिजरेटर, मायक्रोव्हेव, मिक्सर, इस्त्री, वॉशिंग मशीन, गिझर अशी विजेवर चालणारी अनेक उपकरणं आपल्याला दैनंदिन जगण्यात लागत असतात. खरं तर अशा उपकरणांची इतकी सवय होऊन जाते आपल्याला की, ती बंद पडली, नादुरुस्त झाली की त्यांच्यावाचून अडतं आपलं! म्हणूनच आपल्या दैनंदिनीत अत्यावश्यक झालेल्या अशा उपकरणांमधून पावसाळ्यात शॉक लागणार नाही यासाठी आपण सतर्क राहायला हवं. त्यातही हवेतल्या वाढलेल्या आर्द्रतेपासून फ्रीजसारख्या अवजड आणि महाग उपकरणांचं कसं रक्षण करायचं, हे समजून घ्यायला हवं.

त्यासाठी सगळ्यात आधी ज्या ठिकाणी फ्रीज लावला असेल तिथलं आर्थिंग तपासून घ्या. म्हणजे शॉर्टसर्किटला प्रतिबंध होऊ शकेल. पावसाळ्याच्या दिवसात रेफ्रिजरेटरच्या तापमानासंदर्भातलं सेटिंग कमी करण्याची दक्षता न विसरता घ्या. तीव्र आर्द्रतेमुळे पावसाळ्याच्या दिवसात फ्रीजची बाहेरची बाजू, दरवाजा, गॅस्केट यावर बाष्प जमा होणं ही सर्वसामान्य गोष्ट आहे. ते शक्य तेव्हा कोरड्या सुती फडक्याने पुसून घ्या. फ्रीजरमध्ये पावसाळ्यात बर्फ जमण्याची वारंवारिता जास्त असते. त्यामुळे आपण वापरत असलेल्या फ्रीजचं मॉडेल कोणतं आहे, त्यानुसार त्याची डिफ्रॉस्ट सिस्टिम समजून घ्या. काही फ्रीज अधिक वेळा डिफ्रॉस्ट करावे लागू शकतात, हे लक्षात ठेवा. अघोरी मुसळधार पाऊस पडत असल्यास आणि वीजपुरवठा कमी-जास्त होत असल्यास रेफ्रिजरेटरसारख्या अवजड उपकरणांचा प्लग काढून ठेवणं चांगलं. विजांचा कडकडाट अथवा इतर कारणांमुळे या उपकरणांमध्ये बिघाड होऊ शकतो. फ्रीज जेव्हा सुरू करायचा असेल त्यापूर्वी योग्य क्षमतेचा वीजपुरवठा आहे, याची खात्री करा.

## अन्नपूर्णा



### बटाट्याचा कीस

**साहित्य :** मध्यम आकाराचे सहा-सात बटाटे, शेंगदाण्याचं जाडसर कूट, लाल आवडीनुसार तिखट आणि/किंवा हिरव्या मिरच्या, मीठ, साखर, जिरं, तेल किंवा तूप.

**कृती :** सगळ्यात आधी बटाटे स्वच्छ धुऊन घ्या. ते सालासकट किसून घ्या. हा जाडसर कीस दोन-तीनदा पाण्याखाली स्वच्छ धुवा आणि त्यातलं सगळं पाणी निघून जाण्यासाठी तो निथळत ठेवा. जाड बुडाच्या पातेल्यात तुमच्या आवडीनुसार तेल किंवा तूप तापवा आणि जिरं, मिरची घालून फोडणी करा. आता त्यात कीस घाला, व्यवस्थित परता आणि झाकण ठेवून एक वाफ काढा. मग एकदोनदा हलवून त्यात चवीनुसार मीठ, साखर आणि दाण्याचं कूट घाला. सगळं मिश्रण व्यवस्थित हलवून पुन्हा एकदा व्यवस्थित वाफ काढा आणि बटाट्याचा गरमागरम चविष्ट कीस खायला घ्या!

### चमचमीत पापलेट


**साहित्य :** पापलेट, हळद, जाडं आणि साधं मीठ चवीनुसार, केळीचं पान, तेल. (वाटण करण्यासाठी) आलं, लसूण, काळी मिरी, हिरवी मिरची, पुदिना, जवळपास अर्धा कप कोथिंबीर, लिंबू.

**कृती :** सुरुवातीला पापलेट नीट साफ करून घ्या. मग त्याला जाड मीठ व हळद लावा आणि पंधरा-वीस मिनिटं मुरू द्या. या मुरलेल्या माशाला साधारणत: एक-एक इंचावर चीर द्या. दुसरीकडे वाटण करून घ्या. त्यासाठी आलं, लसूण, पुदिना, कोथिंबीर, मिरची, मिरी आणि अर्ध्या लिंबाचा रस एकत्र करून बारीक वाटून घ्या. हे वाटण माशाच्या चिरांमध्ये नीट भरा आणि माशाला वरूनही लावा. आता केळीचं पान तव्यावर रंग बदलेपर्यंत भाजा. वाटण लावलेला मासा त्यात गुंडाळून घ्या आणि दोऱ्याने हलकेच बांधून टाका. हा मासा आता पुन्हा अर्धा तास मुरू द्या. थोड्या तेलावर मध्यम आचेवर पापलेट दोन्ही बाजूंनी नीट भाजून घेतला की, हा चमचमीत मासा खाण्यासाठी तय्यार असेल.



## शोध पर्यायांचा!

विचारी मना



एकाच एका विचार पद्धतीला चिकटून न राहता प्रश्न सोडवण्याच्या वेगवेगळ्या उपायांचा विचार करत राहिलं, तर आशादायी पर्याय समोर दिसायला लागतात आणि त्यातून दैनंदिन जीवनातला ताण कमी व्हायला मदत होते. एक उदाहरण पाहूया. परीक्षा जवळ आलीय आणि सुरेखा अभ्यासाला बसलीय. पुस्तक-वही उघडी आहे; पण काही कळत नाहीये, लक्षात राहत नाहीये, पाठ होत नाहीये. अशा वेळी सर्वसाधारणपणे काय घडतं? टेन्शन दाटतं आणि एक प्रकारचं नकारात्मक चक्र सुरू होतं, हेच नेमकं परीक्षेला विचारलं तर? हे फार कठीण आहे, आपलं काही खरं नाही, जाऊ दे; दुसरा विषय घेऊया अभ्यासाला. टेन्शनपायी तेही डोक्यात शिरत नाही, अभ्यास नको वाटतो, आपल्याला काहीच येत नाही, असं वाटतं. सगळेच विषय अवघड होऊन बसतात. आपण ढ आहोत, आपल्याला डोकं नाही. रडारड, अस्वस्थता, चिडचिड... खेळण्यातही नाही आणि खाण्यातही नाही. खरं तर कशातच मन लागत नाही. आपण नापास होणार, परीक्षाच नको द्यायला वगैरे चक्र भंडावून सोडतं!

सर्वसाधारणपणे काय घडू शकतं हे पाहिल्यावर आता थोडा पर्यायांचा विचार करून पाहूया. वर नोंदवलेले सर्वसाधारण विचार बाजूला ठेवून पुढे नोंदवलेल्या गोष्टी करून पाहिल्या तर? बघा बरं, आता थोडा असा विचार करा. जेवढा होईल तेवढा अभ्यास नीट करेन, पेपरच्या वेळी गोंधळणार नाही, निराश होणार नाही, पेपर नीट लिहीन, असा विचार मनाशी पक्का करेन, परीक्षा ही तशी दूरची गोष्ट आहे; आधी अभ्यास नीट कसा होईल हे पाहायला हवं, जे समजत नाहीये ते कुणाकडून समजून घेता येईल का. मदत घेण्यात काहीच कमीपणा नाही. मी कुणाची मदत घेऊ शकेन, वेळ वाया न घालवता जे समजलंय ते पक्कं करता येईल का, अभ्यासाच्या एकाग्रतेसाठी मन शांत करता येईल का, थोडं वाचणं थोडं लिहून पाहणं, थोडं पाठांतर, थोडी उजळणी, थोडं नवं शिकणं, थोडा अभ्यास, थोडा ब्रेक/विश्रांती/खेळ/मनोरंजन असं करत मन आणि शरीर स्थिर करता येईल का, ज्या विषयाचा फार ताण नाही अशा विषयाने सुरुवात करून मग अवघड गोष्टींकडे वळूया का, फक्त आता अभ्यास होत नाहीये हे खरंय; पण म्हणून काही आपण ढ आहोत असं होत नाही. मग असं लेबल आपण स्वत:ला का लावतोय? त्यापेक्षा जेवढा वेळ आहे तेवढा आपल्याला जास्तीत जास्त चांगल्या पद्धतीने कसा वापरता येईल..? पर्यायी विचार कसे असू शकतात हे समजून घेण्यासाठी सुरेखा हे नाव इथे फक्त उदाहरणादाखल आपण वापरलंय. प्रत्यक्षात आपल्यातलं कुणीही अशा आशादायी पर्यायांचा विचार करू शकतं आणि ताण निर्माण करणारी परिस्थिती यथायोग्य पद्धतीने हाताळण्याचा प्रयत्न करू शकतं, यात शंका नाही.

## वंदना शिवा
### (५ नोव्हेंबर, १९५२)

'ती'च्या पाऊलखुणा



जैवविविधता, बौद्धिक संपदा अधिकार, जैवतंत्रज्ञान, जैविकशास्त्र, अभियांत्रिकी क्षेत्रात अतुलनीय योगदान देण्यापासून ते कृषी आणि अन्नधान्य व्यवहारामध्ये आमूलाग्र परिवर्तन घडवण्यासाठी संघर्ष करण्यापर्यंतचं मोठं कार्य वंदना शिवा यांच्या नावे नोंदलं गेलं आहे. 'राईट लाईव्हलीहूड', 'गोल्डन प्लाण्ट', 'होरायझन', 'सेव्ह द वर्ल्ड' आणि 'फुकुओका' यांसारख्या मोठमोठ्या पुरस्कारांनी सन्मानित पर्यावरणवादी कार्यकर्त्या व लेखिका अशीही त्यांची जगभरात ओळख आहे. उत्तराखंड राज्यातल्या डेहराडून इथे जन्मलेल्या वंदना यांनी भौतिकशास्त्रात मूलभूत शिक्षण घेऊन पुढे कॅनडातल्या ओंटॅरिओ विद्यापीठातून १९७८ साली पीएच.डी. पूर्ण केलं. त्यानंतर भारतीय विज्ञान संस्था आणि भारतीय व्यवस्थापन संस्था यांच्या विज्ञान, तंत्रज्ञान आणि पर्यावरणविषयक धोरणांच्या परस्पर संबंधांवर संशोधन केलं. एकीकडे अभ्यास चालू असतानाच त्यांच्या सामाजिक व संघर्षात्मक धडपडीलाही आकार येत होता. सत्तरच्या दशकात जगभर गाजलेल्या भारतातल्या चिपको आंदोलनात सहभागी झालेल्या वंदना शिवा पुढे जाऊन नव्वदच्या दशकात जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर बुलंद झालेल्या पर्यावरणवादी चळवळीचा आवाज बनल्या. पर्यावरण आणि शेतीविषयक संशोधन व संघर्ष हेच जणू त्यांचं जीवितकार्य झालं. त्यांनी १९८२ साली रिसर्च फाऊंडेशन फॉर सायन्स, टेक्नॉलॉजी अँड इकॉलॉजीची स्थापना केली. १९९१ मध्ये 'नवधान'च्या माध्यमातून जीवनावश्यक संसाधनांचा विशेषतः वाणांच्या देशी जाती, जैविक शेती यांचा सुयोग्य व्यापार वाढवण्यासाठी, विविधता व एकात्मतेचं संरक्षण करण्यासाठी त्यांनी चळवळ उभारली. विविध प्रकारच्या प्रादेशिक कृषी वाणांचं महत्त्व अधोरेखित करण्यासाठी भारतभरातील अनेक बियाण्यांच्या ब्रँड्सची मुहूर्तमेढ रोवली. त्यांनी अभ्यासपूर्ण पद्धतीने लिहिलेली वीसहून अधिक पुस्तकं तर केवळ आपल्यासाठीच नाही, तर अवघ्या जगाच्या भविष्यासाठी मार्गदर्शक ठरावीत अशी आहेत, हे विशेष!

## निकोप दृष्टिकोन

'स्त्री' संतवाणी



वैदिक परंपरेत स्त्री, शूद्र परमार्थ ज्ञानापासून वंचित राहिले होते. चारही वर्णातील स्त्रियांना व पुरुषांना परमार्थ साधना करण्याचा समान अधिकार आहे, असा विचार चक्रधर स्वामींनी मांडला आणि महानुभाव पंथांमध्ये सर्वांना प्रवेश खुला केला. महानुभाव संप्रदाय आणि वारकरी संप्रदाय हे एकाच काळातील भक्ती संप्रदाय. या दोन्ही संप्रदायांनी स्त्री, शूद्रांना परमार्थ ज्ञान जाणून घेण्याचा अधिकार दिला. पण 'स्त्री देह धारण केल्यामुळे मुक्तीचा अनुभव अशक्यप्राय आहे,' असा जो विचार महानुभाव संप्रदायामध्ये दिसतो, त्या उलट विचार वारकरी संप्रदायामध्ये दिसतो.

'जववरी देह आहे तववरी साधन।
करूनिया ज्ञान सिद्ध करा।।'

हा विचार संत ज्ञानेश्वरांनी मांडला आहे. परमार्थ साधण्याचं माध्यम म्हणून शरीर महत्त्वाचं आहे. त्यामुळे स्त्रीचा देह; एकूणच 'देह' हे परमार्थ साधनेतला अडथळा असूच शकत नाही, हा देहाकडे पाहण्याचा न-नैतिक दृष्टिकोन ज्ञानेश्वरांनी मांडला. त्यामुळे वारकरी संप्रदायात स्त्री देह हे मोहाचं अथवा तमगुणांचं वाहन बनण्याचं कारण आहे, असा विचार होणं शक्य नव्हतं. वारकरी संप्रदायात संत कवयित्रींची समांतर परंतु स्वतंत्र सशक्त परंपरा निर्माण झाली; त्यामागे स्त्री देहाकडे पाहण्याचा निकोप दृष्टिकोन हे प्रमुख कारण आहे. यासंबंधी 'निवडक सकल संत सार्थगाथा' या संपादित ग्रंथामधील प्रस्तावनेत मांडलेले विचार इथे नोंदवले पाहिजेत, असं वाटतं. जिवंतपणीच आपण कोण आहोत याचे चिंतन करून ते समजून घ्यावे. त्यामुळे याच जन्मात मोक्षप्राप्ती होईल. तुकोबा म्हणतात त्याप्रमाणे, ''याची देही याची डोळा। भोगीन मुक्तीचा सोहळा।।' देह असल्या-नसल्याने काही फरक पडत नाही. 'म्हणोनि देह असो अथवा जावो,' आम्ही केवळ वस्तूच आहे, ही ज्ञानेश्वरांचीच ग्वाही आहे.'

महानुभाव पंथ आणि वारकरी संप्रदायाने स्त्रियांना ज्ञानाचा समान अधिकार आहे, हा क्रांतिकारक विचार मांडला. अर्थात, त्यामागच्या दृष्टिकोनांमधला हा फरकही आपण समजून घ्यायला हवा.

- डॉ. रूपाली शिंदे

## महत्त्वाचे



**अकोला : तांत्रिक बिघाड निर्माण होऊन आगीच्या भक्ष्यस्थानी पडलेली शिवशाही बस. चालकाच्या प्रसंगावधानामुळे बसमधील ४४ प्रवाशांचे प्राण वाचले.**

### अकोल्याजवळ बर्निंग शिवशाही बसचा थरार; ४४ प्रवासी सुरक्षित

**अकोला : पुढारी वृत्तसेवा**

शेगाववरून अकोल्याकडे येणाऱ्या शिवशाही बसला गुरुवारी दुपारी राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५३ वर रिधोरा गावानजीक अचानक आग लागली. बसचालकाने प्रसंगावधान दाखवल्यामुळे ४४ प्रवाशांचे प्राण वाचले. आगीत बस खाक झाली. या घटनेमुळे शिवशाही बसच्या सुरक्षिततेवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह लागले आहे.

अकोला आगार क्रमांक दोनची शिवशाही बस प्रवाशांना घेऊन सकाळी शेगावला गेली होती. तेथून ४४ प्रवासी घेऊन परतीच्या मार्गावर असलेली विनावाहक बस रिधोरा गावानजीक आली असता बसमध्ये तांत्रिक अडचण निर्माण झाली आणि चालकाच्या कक्षामध्ये भीषण आग लागली. यानंतर चालक पी. एन. डोंगरे यांनी प्रसंगावधान राखून बस थांबवली. त्यांनी प्रवाशांना वेळीच घटनेची माहिती देऊन बसमधून तातडीने उतरण्यास सांगितले.

पाठोपाठ डोंगरे यांनी अग्निशमन यंत्राद्वारे आग नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न केला. मात्र, आग आटोक्यात आली नाही. त्यामुळे काही मिनिटांत संपूर्ण बस आगीच्या भक्ष्यस्थानी सापडली. या घटनेची माहिती मिळताच अग्निशमन पथकाने घटनास्थळावर धाव घेऊन जळत्या बसवर पाण्याचा मारा केला आणि आगीवर नियंत्रण मिळवले. चालकाने वेळीच दक्षता घेतल्यामुळे ४४ प्रवाशांचा जीव वाचला.

### छत्रपती संभाजीनगरच्या पालकमंत्री पदी अब्दुल सत्तार

**मुंबई: पुढारी वृत्तसेवा**



छत्रपती संभाजीनगरचे पालकमंत्री सांदिपान भुमरे यांच्या जागी भाजपचे नेते व ओबीसी कल्याण मंत्री अतुल सावे यांना पालकमंत्रीपदी नियुक्त करण्याची मागणी भाजपतर्फे लावून धरली जात असतानाच शिवसेनेचेच पणन व अल्पसंख्यंक कल्याण मंत्री अब्दुल सत्तार यांच्याकडे हे पद सोपविण्यात आले आहे. सत्तार यांना ही जबाबदारी सोपवून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी एका दगडात अनेक पक्षी मारले आहेत. लोकसभेच्या निवडणुकीत शिंदे गटाचे सांदिपान भुमरे यांनी विजय मिळविल्याने हा जिल्हा शिवसेनेचा बालेकिल्ला असल्याचे आणि येथील शिवसेना शिंदे यांच्यासोबत असल्याचे संकेत प्राप्त झाले होते. त्यामुळे विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर शिंदे यांनी या जिल्ह्यावर लक्ष केंद्रित केले आहे. म्हणूनच पालकमंत्रीपद भाजपला न देता त्यांनी आपल्याच पक्षाकडे हे पद राहील याची काळजी घेतली आहे. भाजपच्या दबावात आपण बळी पडत नसल्याचे संकेतही त्यांनी पक्षाच्या कार्यकर्त्यांना दिले आहेत. सत्तार यांनी मध्यंतरी शिवसेना (शिंदे) गटातून बाहेर पडण्याचे संकेत दिले होते. त्यांच्यावर ही नवी जबाबदारी देऊन त्यांची नाराजी दूर करण्याचा प्रयत्न केला आहे. सत्तार हे आजवर हिंगोलीचे पालकमंत्री होते. आता त्यांना हिंगोलीसोबतच छत्रपती संभाजी नगरची जबाबदारी देण्यात आली आहे. मुख्यमंत्र्यांच्या या निर्णयावरुन विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांनी भाजपला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न केला. मंत्री अतुल सावे यांना पालकमंत्री करावे ही निष्ठावंत भाजप कार्यकर्त्यांची मागणी डावलण्यात आली. त्यामुळे आता भाजप पदाधिकाऱ्यांच्या शब्दाला सत्ताकारणात किंमत उरली नसल्याचा टोला त्यांनी लगावला.

### तेव्हाच फडणवीस यांना आरोपी का केले नाही?; बावनकुळेंचा हल्लाबोल

**नागपूर : पुढारी वृत्तसेवा**

चार मुद्द्यांवर खोटे प्रतिज्ञापत्र दाखल करण्यासाठी भाजप नेते देवेंद्र फडणवीस यांनी दबाव टाकला तेव्हाच गृहमंत्री असलेल्या अनिल देशमुख यांनी एफआयआर दाखल करून त्यांना आरोपी का केले नाही, असा हल्लाबोल भाजप प्रदेशाध्यक्ष आमदार चंद्रशेखर बावनकुळे यांनी केला आहे.

आपल्या भ्रष्टाचारावर पांघरूण घालण्यासाठी खोटा नरेटिव्ह पसरविणे व समाजात दुफळी निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे, असा आरोप त्यांनी विरोधकांवर केला. बावनकुळे म्हणाले, मुळात गृहमंत्र्यांवर कुणी दबाव टाकू शकत नाही, ही महाराष्ट्राची संस्कृती नाही. फडणवीसांनी तेव्हा दबाव टाकला, असे आज अडीच वर्षांनंतर सांगणे सर्वस्वी चुकीचे आहे. अशा कपोलकल्पित बातम्या तयार करणे योग्य नाही.

**संभ्रमासाठी मविआची विखारी टीम**

प्रा. श्याम मानव यांच्यासह ६८ लोकांची विखारी टीम महाविकास आघाडीने तयार केली आहे. सामाजिक आरोग्य बिघडवून समाजात दुही निर्माण करण्यासाठी वेगवेगळी केंद्रे तयार केली जात आहेत. वेळ आल्यावर आम्ही सगळ्यांची नावे जाहीर करू, असा इशारा बावनकुळे यांनी दिला.

# मुंबईच्या गतीला लोकलचा ब्रेक

## कुर्ला, घाटकोपर स्थानकांत पाणी, दिवसभरात लोकलच्या १०० फेऱ्या रद्द

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

मुंबई,नवी मुंबई,ठाण्यासह आजूबाजूच्या परिसरात सुरू असलेल्या मुसळधार पावसाचा फटका गुरुवारी मध्य आणि हार्बर मार्गावरील लोकलसह लांब पल्ल्याच्या मेल-एक्स्प्रेसला बसला. दिवसभरात लोकलच्या १०० पेक्षा जास्त फेऱ्या रद्द करण्यात आल्याने मुंबईकरांना गर्दीतून प्रवास करावा लागला.यामुळे प्रवाशांचे प्रचंड हाल झाले. दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास कुर्ला आणि घाटकोपर स्थानकात पाणी भरल्याने अप आणि डाऊन दोन्ही मार्गांवरील वाहतूक विस्कळीत झाली होती.

गुरुवारी सकाळपासूनच शहराला मुसळधार पावसाने अक्षरशः झोडपून काढले.यामुळे शहरातील अनेक सखल भागात पाणी भरल्याने जनजीवन विस्कळीत झाले होते. पावसाचा फटका लोकलसेवेला देखील बसला. पहाटेपासून कोसळणाऱ्या पावसामुळे लोकलचा वेग मंदावला होता.

सकाळी पावणे दहा वाजण्याच्या सुमारास पनवेल ते चौक दरम्यान रुळांवर पाणी भरले होते.त्यामुळे मुंबईच्या दिशेने येणारी मेल-एक्स्प्रेसची वाहतूक काही काळासाठी रखडली होती. मुंबईत येणारी प्रगती एक्स्प्रेस कल्याणमार्गे चालविण्यात आली. रुळांवर आलेले पाणी कमी झाल्यानंतर दुपारी १ वाजता पनवेल-चौक दरम्यानची रेल्वेसेवा सुरू करण्यात आली. यामुळे अनेक मेल-एक्स्प्रेस गाड्यांना लेटमार्क लागला. रेल्वे प्रशासनाने रुळांवर पाणी आल्याने लोकलच्या वेगावर मर्यादा घातली होती. आधीच पावसामुळे हवेतील दृष्यमानता कमी होती.त्यातच लोकलच्या वेगावर अतिरिक्त निर्बंध आल्याने गाड्यांचा वेग आणखीनच मंदावला होता. लोकल अतिशय संथ गतीने धावत असल्याने गाड्यांच्या एकामागोमाग एक रांगा लागल्या होत्या.यामुळे सर्वच स्थानकांत प्रवाशांची सकाळपासूनच एकच गर्दी झाली होती. आधीच पावसाचे थैमान, त्यातच लोकलच्या वाहतुकीचा खोळंबा झाल्याने गाड्यांना प्रचंड गर्दी झाली होती. दिवसभरात मध्य रेल्वेच्या मेन लाईनची वाहतूक एक तास, तर हार्बर मार्गावरील लोकल ३० ते ४० मिनिटे विलंबाने धावत होत्या. यामुळे प्रवाशांचे प्रचंड हाल झाले.



### विक्रोळी-घाटकोपर दरम्यान रुळाला तडा

● दिवसभर पावसामुळे विस्कळीत झालेली मध्य रेल्वे सायं. ६च्या दरम्यान विक्रोळी ते घाटकोपर स्थानकांदरम्यान रुळाला तडा गेल्याने ठप्प झाली होती. त्यामुळे सीएसएमटीच्या दिशेची वाहतूक कोलमडली होती. प्रवाशांच्या सोयीसाठी अप जलद मार्गावरील वाहतूक अप धीम्या मार्गावरून वळविण्यात आली. साडेसहा वाजता तडा दुरुस्त करून वाहतूक सुरू केली. मात्र, त्यानंतर ३० कि.मी.च्या वेगाने लोकल धावल्याने प्रवासी घरी उशिरा परतले.

## मनसे २२५ जागा लढणार आणि सत्तेत बसणार

### राज ठाकरेंची घोषणा; पदाधिकारी मेळाव्यात स्वबळाची भाषा

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

आगामी विधानसभा निवडणुकीत आपल्या लोकांना सत्तेत बसवायचे आहे. ही गोष्ट घडणार आहे. त्यासाठी आम्ही सर्वच जण तयारीला लागलो आहोत. त्यामुळे युती होणार की नाही, हा विचार तुम्ही करू नका. आपण २०० ते २२५ जागा लढणार आहोत. त्यासाठी तयारीला लागा, असे सांगत मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी गुरुवारी स्वबळाचा नारा दिला. तसेच, १ ऑगस्टनंतर राज्याचा दौरा करणार असल्याचेही त्यांनी मेळाव्यात जाहीर केले.

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गुरुवारी वांद्रे येथील रंगशारदा सभागृहात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांचा मेळावा पार पडला. मेळाव्यास मनसेचे सर्व नेते, सरचिटणीस, विभागप्रमुख, विभाग अध्यक्षांसह प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. लोकसभेला मोदींच्या पंतप्रधान पदासाठी बिनशर्त पाठिंब्याची मनसेची भूमिका होती. त्यामुळे मनसे महायुतीत असल्याचे मानले जात असतानाच लोकसभेच्या निकालापासून राज ठाकरे यांनी राज्यात सव्वादोनशे जागा लढवणार असल्याची भूमिका मांडण्यास सुरुवात केली आहे. दरम्यान, महाराष्ट्रात अनेक ठिकाणी पूरपरिस्थिती आहे. लोकांना मदतीची गरज आहे. त्यामुळे तुम्ही या लोकांकडे जा, त्यांना मदत करण्याची सूचनाही त्यांनी पदाधिकाऱ्यांना केली आहे.

#### खड्डे बुजवायला पैसे नाहीत, लाडक्या बहिणींसाठी कुठून आणणार?



● खड्डे बुजवायला पैसे नाहीत मग लाडकी बहीण योजनेसाठी पैसे कुठून आणणार, असा टोलाही त्यांनी यावेळी लगावला. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेवरून राज ठाकरे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांना अप्रत्यक्षरीत्या टोला लगावला. लाडकी बहीण आणि लाडका भाऊ. अहो,लाडकी बहीण आणि भाऊ एकत्र आले असते तर दोन्ही पक्ष टिकले असते, असे ते म्हणाले.

## माजी सैनिकांच्या कल्याणासाठी महामंडळ स्थापन करणार

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

माजी सैनिकांच्या कल्याणासाठी महामंडळ स्थापन करण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गुरुवारी दिले आहेत. सह्याद्री अतिथीगृह येथे यासंदर्भात बैठक झाली. यावेळी शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव विकास खारगे, माजी सैनिक कल्याण विभागाचे सचिव सुमंत भांगे, ब्रिगेडियर सुधीर सावंत, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी प्रांजल जाधव आदी अधिकारी यावेळी उपस्थित होते.

यावेळी माजी सैनिकांच्या विविध विषयांसंदर्भात आढावा घेण्यात आला. खारघर येथे माजी सैनिकांसाठी विश्रामगृह, मेस्को महामंडळामार्फत होणारे उपक्रम, माजी सैनिकांचे वेतन, मुंबईमध्ये संग्रहालय उभारणे, सातारा जिल्ह्यातील सैनिकांचे गाव अशी ओळख असलेल्या अपशिंगे गावाला विशेष दर्जा देऊन तेथे विकासकामे करणे, माजी सैनिकांना टोलमध्ये सवलत आदी विविध विषयांबाबत सविस्तर चर्चा झाली.

सैनिकांनी देशासाठी जीवाची पर्वा न करता सीमेवर कर्तव्य बजावले आहे. अशा माजी सैनिकांच्या कल्याणासाठी महामंडळ करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी विभागाच्या सचिवांना दिले. माजी सैनिकांच्या विश्रामगृहाला सिडकोतर्फे नवी मुंबईतील खारघर येथे जागा देण्यात आली आहे. तेथे विश्रामगृहाच्या कामाला तातडीने सुरुवात करावी, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

## वंचितच्या ‘आरक्षण बचाव यात्रे’ला मुंबईतून सुरुवात

**मुंबई: पुढारी वृत्तसेवा**

ओबीसींचे आरक्षण वाचविण्यासाठी मैदानात उतरलेल्या वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांची गुरुवारी, सकाळी ‘आरक्षण बचाव यात्रा’ मुंबईतून सुरू झाली. चैत्यभूमी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर व वीर भाई कोतवाल यांना अभिवादन करून यात्रेला सुरुवात करण्यात आली.

मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्याची मागणी मनोज जरांगे पाटील यांनी केली आहे. त्या पार्श्वभूमीवर प्रकाश आंबेडकर यांनी ओबीसींचे आरक्षण वाचविण्यासाठी ‘आरक्षण बचाव यात्रा’ काढण्याची घोषणा केली होती. या यात्रेत सहभागी होण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार व मंत्री छगन भुजबळ यांच्यासह विविध पक्षांच्या नेत्यांना निमंत्रण पाठवण्यात आले होते.



**मुंबई: वंचितच्या आरक्षण बचाव यात्रेला चैत्यभूमीपासून सुरुवात करण्यात आली. यावेळी अॅड. प्रकाश आंबेडकर यांच्यासह वंचितच्या अनेक पदाधिकाऱ्यांनी आपला सहभाग नोंदवला.**

ही यात्रा पुण्यातील महात्मा फुले वाडा येथे जाईल. तेथून सावित्रीबाई फुले यांचे जन्मस्थळ असलेल्या नायगाव, सातारा येथे जाणार आहे. तसेच रात्री कोल्हापूरमध्ये मुक्काम करणार आहे. ओबीसी आरक्षण, एससी, एसटी विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती दुप्पट झाली पाहिजे, ओबीसी विद्यार्थ्यांना एससी आणि एसटी विद्यार्थ्यांप्रमाणे शिष्यवृत्ती मिळाली पाहिजे, आदी मागण्यांसाठी ही यात्रा सुरू झाली आहे.

## महाराष्ट्राच्या प्रचारात स्थानिक नेते आणि कार्यकर्त्यांना प्राधान्य

### भाजपचा निर्णय; लोकसभेची पुनरावृत्ती नाही

**नवी दिल्ली : पुढारी वृत्तसेवा**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत भाजप स्थानिक नेते आणि कार्यकर्त्यांना प्राधान्य देणार आहे. त्यांच्या भागातील निवडणूक प्रचाराची जबाबदारी स्थानिक नेते व कार्यकर्तेच घेतील. लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर महाराष्ट्रातील आढावा अहवालांचा अभ्यास करून भाजप नेतृत्वाने हा निर्णय घेतला आहे.

प्रत्येक भागामध्ये प्रचारासाठी स्थानिक नेते आणि कार्यकर्त्यांच्या मदतीसाठी बाहेरील नेत्यांच्या नियुक्त्या करण्यात याव्यात, असे आदेश भाजप अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी दिले. स्थानिक नेते व कार्यकर्त्यांच्या सल्ल्यानुसार प्रचारमोहीम राबवावी. लोकसभा निवडणुकीत स्थानिक नेते आणि कार्यकर्त्यांऐवजी भाजपने अन्य राज्यातील नेत्यांवर प्रचाराची जबाबदारी सोपवली होती. इतर राज्यांतून आलेल्या नेत्यांच्या निवडणूक प्रचाराकडे स्थानिक नेते आणि कार्यकर्त्यांचे पूर्णपणे दुर्लक्ष झाले. त्यामुळे स्थानिक नेते आणि कार्यकर्ते निवडणुकीदरम्यान उदासीन दिसले. याचा मोठा परिणाम भाजपला लोकसभा निवडणुकीत भोगावा लागला. या सर्व गोष्टींचा आढावा लोकसभा अहवालात तपशीलवार असल्याचे सूत्रांनी सांगितले.

## संक्षिप्त

### फडणवीसांकडे क्लिप असतील, तर कारवाई करावीच : पटोले

**नागपूर :** स्वतःकडे विरोधकांच्या ऑडिओ, व्हिडीओ क्लिप असून, त्या उघड करेन, असे देवेंद्र फडणवीस धमकावत आहेत. त्यांच्याकडे अशा क्लिप असतील, तर कारवाई करावी, धमक्या कसल्या देता, असा थेट सवाल काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केला आहे. एकनाथ शिंदे आणि त्यांचे सहकारी ईडीच्या धाकाने भाजपच्या गळाला लागले. तोच प्रयोग माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्यावरही झाला असेल, असे वाटते, असे पटोले म्हणाले.

### नीट परीक्षेचा सुधारित निकाल एनटीएकडून जाहीर

**नवी दिल्ली :** नॅशनल टेस्टिंग एजन्सीने (एनटीए) नीट-यूजी परीक्षेचा सुधारित निकाल जाहीर केला. परीक्षार्थींना एनटीएच्या संकेतस्थळावर निकाल पाहता येणार आहे. सर्वोच्च न्यायालयाने फेरपरीक्षा घेण्यासंदर्भातील याचिका फेटाळल्याच्या पार्श्वभूमीवर सुधारित निकाल जाहीर करण्यात आहे. गैरप्रकार केलेल्या १५५ विद्यार्थ्यांची नावे या निकालातून वगळण्यात आली आहेत. ५ मे रोजी ही परीक्षा घेण्यात आली होती. ४ जून रोजी निकाल जाहीर करण्यात आला होता. २४ लाख विद्यार्थ्यांपैकी १३.१६ लाख विद्यार्थी उत्तीर्ण झाले होते. गैरप्रकार केलेल्या काही विद्यार्थ्यांना पैकीच्या पैकी गुण पडले होते.

### ‘आप’च्या कार्यालयाला अखेर नवीन जागा

**नवी दिल्ली :** उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर केंद्र सरकारने आम आदमी पक्षाच्या कार्यालयासाठी जागा दिली आहे. रविशंकर शुक्ला लेनमधील बंगला क्र. १ हा आता आम आदमी पक्षाचा नवा पत्ता असणार आहे. याआधी आम आदमी पक्षाचे कार्यालय राऊज अव्हेन्यू भागात होते. दिल्ली उच्च न्यायालयाने केंद्राला ‘आप’च्या कार्यालयासाठी जागा देण्यासाठी गुरुवारपर्यंत वेळ दिला होता. यावर प्रतिक्रिया देताना दिल्लीचे मंत्री व ‘आप’चे नेते सौरभ भारद्वाज यांनी म्हटले की, आम आदमी पक्षाला कार्यालयातून हुसकावून लावण्याचा प्रयत्न करण्यात आला.

### आरक्षण न देणाऱ्यांवर जरांगे का बोलत नाहीत? : शेलार

**मुंबई :** ज्यांनी मराठा समाजाला कधी आरक्षण दिले नाही, किंबहुना ज्यांनी मिळालेले आरक्षण घालवले, त्यांच्या विरोधात जरांगे पाटील कधीच चकार शब्द काढत नाहीत. उलट ज्यांनी आरक्षण दिले त्यांच्या विरोधातच जरांगे का बोलतात, असा प्रश्न मुंबई भाजप अध्यक्ष आशिष शेलार यांनी केला आहे. तसेच महाराष्ट्रात हिंदूंच्या बाजूने बोलणाऱ्या भाजपला संपवण्याचे मोठे षड्यंत्र रचले जात असल्याचा आरोपही त्यांनी केला. मराठा आंदोलक जरांगे पाटील यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर केलेल्या टीकेच्या पार्श्वभूमीवर शेलार म्हणाले की, मराठा समाजाच्या मागणीला भाजपचे संपूर्ण समर्थन आहे.

### नीट-यूजीप्रकरणी झारखंडमध्ये सीबीआयचे छापे

**रांची :** नीट-यूजीप्रकरणी केंद्रीय गुन्हे अन्वेषण शाखेने (सीबीआय) झारखंडमधील हजारीबाग या ठिकाणी गुरुवारी छापे टाकून ३५ जणांना अटक केली. बिहारमधून काही संशयितांची चौकशी केल्यानंतर बिहार पोलिसांसमवेत सीबीआयचे पथक थेट झारखंडला रवाना झाले. सीबीआयने हजारीबागमधील ३५ जणांना अटक करून त्यांची चौकशी केली. या शासकीय विश्रामगृहातही छापे टाकून पेपरफुटीशी महत्त्वाचे दस्तऐवज ताब्यात घेतल्याची माहिती सूत्रांनी दिली.

# मुंबई-गोवा महामार्ग करणार भाजपची कोंडी

## सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांच्यावर मुख्यमंत्री नाराज

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

मुंबई-गोवा महामार्ग हा जवळपास पूर्ण झाला असल्याच्या जाहिराती करून कोकणवासीयांची फसवणूक करणारे सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांच्या कार्यपद्धतीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे कमालीचे नाराज आहेत. खड्डमुक्त रस्ते करण्याची चव्हाण यांची घोषणा हवेत विरली असून यावर्षी मुंबई-गोवा रस्त्याबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतलेल्या बैठकीला रवींद्र चव्हाण यांनी दांडी मारली.

दरम्यान, गणेशोत्सवापूर्वी मुंबई-गोवा महामार्ग आणि मुंबई-नाशिक महामार्ग खड्डेमुक्त करावा, असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत. १०ऑगस्टनंतर दोन्ही महामार्गांच्या कामांची पाहणी करण्यासाठी भेट देणार असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी जाहीर केले.

रवींद्र चव्हाण यांनी मुंबई-गोवा महामार्ग मागील गणेशोत्सवापूर्वी पूर्ण करणार, खड्डे भरले जाणार, अशा अनेक घोषणांचा पाऊस गेल्या वर्षी पाडला होता. पण प्रत्यक्षात काही झाले नाही. कोकणवासीयांचे हाल थांबले नाहीत. पळस्पे ते इंदापूर महामार्गाचे अडकलेले काम पूर्ण करू, असे सांगत या मार्गावर जाऊन फोटो काढून घेतले. अनेक दौरे केले. त्यामुळे कोकणवासीयांच्या आशा पल्लवित झाल्या होत्या. पण प्रत्यक्षात कोकणवासीय प्रवासाला गेले तेव्हा त्यांचे रस्ता पूर्ण नसल्याने, तसेच खड्डे असल्याने त्यांचे अतोनात हाल झाले. गावी जाण्यासाठी १५ तास प्रवास करावा लागल्याने कोकणवासीयांनी सरकारला लाखोली वाहिली. या दरम्यान, मुंबई-गोवा महामार्गावर रवींद्र चव्हाण यांच्या अभिनंदनाचे फलक झळकले होते. त्यामुळे तर कोकणवासीय अधिक नाराज झाले. त्यामुळे यावेळी गणेशोत्सवापूर्वी खुद्द मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बैठक बोलवली होती. मागचा कटू अनुभव कोकणवासीयांना येऊ नये तसेच आगामी विधानसभा निवडणुकीत फटका बसू नये, यासाठी मुख्यमंत्री शिंदे हे स्वतः या महामार्गाची पाहणी करणार आहेत.

महामार्गाबाबतच्या बैठकीला शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर, बंदरे, क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे, आमदार किशोर दराडे, भरत गोगावले, माजी खासदार ब्रिगेडियर सुधीर सावंत आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, गणेशोत्सवादरम्यान मुंबई-गोवा महामार्गावरून लाखो चाकरमानी कोकणात जातात. त्यांचा प्रवास सुखकर आणि सुरक्षित होणे आवश्यक आहे. यासाठी गणेशोत्सवापूर्वी या मार्गावरील जड वाहतूक पर्यायी मार्गाने वळवावी. महामार्गावरील शक्य तेवढ्या मार्गाचे रुंदीकरण करून वाहतूक गतिमान होईल, याकडे लक्ष द्यावे. महामार्गावर आवश्यक त्या ठिकाणी रिफ्लेक्टर लावावेत, दरडप्रवण असणाऱ्या परशूराम घाटात मुंबई-पुणे एक्स्प्रेसच्या धर्तीवर सुरक्षा जाळ्या लावाव्यात. ज्या भागातील रस्त्याचे काम पूर्ण झाले असेल तेथील बांधकाम साहित्य हटवून रस्ता मोकळा करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले.

तसेच गणेशोत्सवादरम्यान माणगाव, इंदापूर या शहरांत होणारी वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी पोलीस प्रशासनाने विशेष काळजी घ्यावी. वाहन दुरुस्तीची व्यवस्था करावी, अशा सूचनाही मुख्यमंत्र्यांनी दिल्या. दरम्यान, गणेशभक्तांच्या सोईसाठी महामार्गावर दर १० किमी अंतरावर वैद्यकीय मदत कक्ष आणि वाहन दुरुस्तीची व्यवस्था करावी, अशा सूचनाही मुख्यमंत्र्यांनी दिल्या.



### मुंबई-नाशिक महामार्गाचाही घेतला आढावा

● या बैठकीत मुख्यमंत्र्यांनी मुंबई-नाशिक महामार्गाच्या सद्यस्थितीचा आढावा घेतला. यावेळी ते म्हणाले की, या मार्गावरील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी, खड्डे बुजवण्याबरोबर भिवंडी परिसरातील रस्त्यावर उभे असणाऱ्या अवजड वाहनांच्या पार्किंगसाठी व्यवस्था करावी. मुंबई ते नाशिक महामार्गावरील वाहतूक कोंडी होणारी ठिकाणे ओळखून त्या सोडविण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण आणि स्थानिक प्रशासन यांनी समन्वयाने काम करावे. प्रत्येक काम गुणवत्तापूर्ण आणि कालबद्ध पद्धतीने करावे, यासाठी महामार्ग प्राधिकरणाने ठाणे जिल्ह्यात वरिष्ठ अधिकाऱ्याची नियुक्ती करावी, असेही मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

## राज्यात नाशिक, छत्रपती संभाजीनगर, सोलापूर येथे कांदा महाबँक

### अणुऊर्जेच्या वापराने कांद्याची नासाडी रोखणार

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

कांद्याच्या साठवणुकीसाठी महाराष्ट्रात अणुऊर्जाआधारित कांदा महाबँक प्रकल्प सुरू होत आहे. राज्यात नाशिक, छत्रपती संभाजीनगर आणि सोलापूर येथे तातडीने कांद्याची बँक सुरू करण्यात यावी, असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गुरुवारी दिले.

कांदा महाबँक प्रकल्पाचा आढावा घेण्यासाठी मुख्यमंत्री शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृह येथे बैठक झाली. यावेळी पणनमंत्री अब्दुल सत्तार, क्रीडामंत्री संजय बनसोडे, परमाणू आयोगाचे माजी अध्यक्ष ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर उपस्थित होते.

कांदा हे नाशिवंत पीक आहे. अणुऊर्जेच्या माध्यमातून त्यावर प्रक्रिया करून कांद्याची साठवणूक करता येईल. या कांदा बँकेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना मोठा फायदा होणार आहे. कांद्याची महाबँक ही संकल्पना प्रत्यक्षात येत असून, त्याची सुरुवात अहमदनगर जिल्ह्यातील राहुरी येथून होत आहे.

या ठिकाणी हिंदुस्थान अग्रो संस्थेच्या माध्यमातून कांद्याची बँक सुरू होत आहे, असे मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

कांद्याचे उत्पादन ज्या भागात जास्त प्रमाणात होते, अशा नाशिक, छत्रपती संभाजीनगर, सोलापूर येथे विकरण प्रक्रिया केंद्र उभारून कांद्याची महाबँक तातडीने सुरू करण्यात यावी. यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, पणन, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या जागांचा वापर करण्यात यावा, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

### एकाचवेळी पाच चपात्या तयार; महिलेने शोधला आगळा उपाय



**नवी दिल्ली :** घरी पाहुणे आल्यानंतर चपात्या लाटताना महिलांची तारांबळ उडते. यावर एका महिलेने नामी उपाय शोधला काढला आहे. याचा व्हिडीओ इन्स्टाग्राम यूझर जेसिका गुप्ता यांनी आपल्या अकाऊंटवरून शेअर केला आहे. एकाचवेळी भरपूर चपात्या करण्याची ही शक्कल अनेकांना खूप आवडली आहे. व्हायरल व्हिडीओमध्ये या महिलेने सगळ्यात आधी कणकीचा गोळा किचन प्लॅटफॉर्मवर ठेवून लाटणीच्या मदतीने लांब लाटून घेतल्याचे दिसत आहे. त्यानंतर मध्यम आकाराचा डबा त्यावर ठेवून चपात्यांना आकार दिला आहे. आपण पुऱ्या करतो त्याच प्रकारे या महिलेने चपात्या केल्या आहेत. त्यानंतर तिने एका तव्यावर ३ ते ४ चपात्या शेकण्यासाठी ठेवल्या आहेत आणि दुसऱ्या बाजूला टम्म फुगलेल्या चपात्या थेट आचेवरून खाली उतरवल्या जात आहेत. या व्हिडीओला आतापर्यंत दहा लाखांहून अधिक लाईक्स मिळाले आहेत.

# रोज झाडाखाली, पाऊस आल्यावर गोठ्यात भरते शाळा!

- वंजारवाडी वस्ती शाळेला १० वर्षांपासून इमारतच नाही
- डॉ.गणेश ढवळे म्हणलेव्ही शिक्षण विभागाचे दुर्लक्ष
- लोकप्रतिनिधींनी लक्ष देण्याची होतेय मागणी
- जिल्ह्यात बहुतांश शाळांची दयनीय अवस्था

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील बाहेगव्हाण शाळे अंतर्गत येणाऱ्या वंजारवाडी वस्तीवरील विद्यार्थ्यांना गेल्या १० वर्षांपासून इमारतच नाही. वस्तीवरील ग्रामस्थांनी लोकवर्गणीतून शाळेसाठी पत्र्याच्या शेडची उभारणी केली होती.दोन महिन्यांपूर्वी झालेल्या वादळवा-यात पत्र्याचे शेड उडुन गेले त्यामुळे आता विद्यार्थ्यांना झाडाखाली बसुन शिक्षण घेण्याची वेळ आली आहे. मात्र पाऊस आल्यावर गोठ्यात बसुन शिक्षण घ्यावे लागत असल्याने वस्तीवरील पालकांनी तिव्र नाराजी व्यक्त केली आहे. या शाळेसाठी निदान एका खोलीसाठी निधी देऊन तातडीने बांधकाम करून विद्यार्थ्यांच्या पायाभुत शिक्षणाचा प्रश्न सोडवावा अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी लेखी निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद बीड यांना केली आहे.



वडवणी तालुक्यातील बाहेगव्हाण शिवारात बाहेगव्हाण शाळे अंतर्गत वंजारवाडी वस्ती येथे १० वर्षांपूर्वी जिल्हा परिषद वस्तीशाळेची स्थापना झाली.शाळा स्थापनेनंतर काही दिवसांनी वस्तीवरील ग्रामस्थांनी एकत्र येत वर्गणी गोळा करून शाळेसाठी पत्र्याच्या शेडची खोली बनवली याच पत्र्याच्या शाळेत विद्यार्थी शिक्षण घेत होते.परंतु दोन महिन्यांपूर्वी आलेल्या वादळ वा-यामध्ये पत्र्याचे शेड उडाले.

## ग्रामीण विद्यार्थ्यांच्या पायाभूत शिक्षणाचा प्रश्न

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शाळेसाठी ईमारत , शुद्ध पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे, डिजिटल शिक्षणासाठी विज आदि.मुलभूत सुविधा नाहीत.इमारत नसल्याने शाळेचे शैक्षणिक रेकॉर्ड तसेच विद्यार्थ्यांसाठी मधल्या सुट्टीमध्ये मिळणाऱ्या पोषण आहाराचे साहित्य ठेवण्यास अडचणीत महत्त्वाचे कागदपत्र आणि साहित्य ठेवण्याचे अडचणी आहेत.शाळेतील विद्यार्थ्यांना कोणत्याही भौतिक सुविधा नाहीत.याकडे वारंवार निवेदन तसेच आंदोलनाद्वारे शिक्षण विभागाकडे पाठपुरावा करून सुद्धा शिक्षण विभागाकडून उपाययोजना होताना दिसत नाहीत.एकदरीतच शिक्षण विभागाला याचे गांभीर्य दिसून येत नाही.

त्यामुळे विद्यार्थ्यांना झाडाखाली बसुन शिक्षण घेण्याची वेळ आली आहे.

पान २ वर...

# चोरट्यांनी संधी साधून डाव साधला

भयभित : साडेचार लाखाचा ऐवज लंपास



घोसला/पुण्यभूमी प्रतिनिधी

-कुटुंबातील सद्स्य बाहेर गावी गेल्याचा डाव साधून अज्ञात चार ते पाच जणांनी कुलूपबंद घर फोडून घरातील सोन्याची चार लाखांच्या दागिन्या सह पन्नास हजार रु रोख असा साडे चार। लाखांचा मुद्देमाल लंपास केल्याची घटना शुक्रवारी रात्री आठ वाजता उघडकीस आली। आहे याप्रकरणी सोयगाव पोलिसांनी रात्री नऊ वाजता घटनेचा पंचनामा करून दहा वाजता अज्ञात चार ते पाच जणांच्या टोळक्याविरुद्ध घरफोडी चा गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती

घोसला येथील चंद्रकांत अर्जुन पाटील माजी सभापती पंचायत समिती सोयगाव हे सोमवारी (दि २२) बहिणीकडे नाशिक येथे कुटुंबातील सदस्यांसह गेले होते ते शुक्रवारी रात्री घरी आले असता त्यांच्या घराचे कुलुप तोडलेले आढळून आले घरात प्रवेश करताच त्यांना चोरी झाल्याची खात्री झाली दरम्यान तातडीने घटनेची माहिती सोयगाव पोलिसांना देण्यात आली चंद्रकांत पाटील यांचे रस्त्याच्या लगत असलेल्या

पान २ वर...

# माजलगाव विधानसभेचे वातावरण तापले!

मागणी : ॲड. नारायण गोले पाटलांना उमेदवारी द्यावी

माजलगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड जिल्हा लाल बावट्याचा बालेकिल्ला म्हणून पूर्वी ओळखला जायचा याच बीड जिल्ह्याने सन १९६७ साली थोर स्वातंत्र्य सेनानी प्रति सरकारचे संस्थापक क्रांतिसिंह नाना पाटील यांना लोकसभेत पाठवले, त्यानंतर स्वातंत्र्यसेनानी माजी खासदार गंगाधर आप्पा बुरांडे यांनी देखील जिल्ह्याचे नेतृत्व केले, त्यानंतर गेवराईतून माजी आमदार भाई पवार, चौसाळा मतदारसंघातून माजी आ. भाई जनार्दन तुपे तर बीड विधानसभेत माजी आ.कॉम्रेड काशिनाथराव जाधव यांच्यासह अनेक लालबावट्याचे आमदारही निवडून आले, त्यामुळे बीड जिल्हा लालबावट्याचा बालेकिल्ला समजला जात असे, सन २००४ साली शेकापच्या भाई थावरेंनी याच मतदारसंघात तब्बल ३५ हजार मते मिळवली होती. तर माजलगाव मतदार संघात चौसाळा मतदार संघातील वडवणी व धारूर तालुक्याचा समावेश झालेला असल्याने वडवणी, धारूर या तालुक्यात शेतकरी कामगार पक्षाला मानणारा खूप मोठा वर्ग आहे. माजलगाव मतदार संघात २०१९ साल च्या विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेस,शेतकरी कामगार पक्ष आघाडीच्या आ.प्रकाश सोळंके यांना माजलगाव मतदार संघातील जनतेने शरदचंद्रजी पवार साहेब आणि पुरोगामी विचाराचे प्रतिनिधी म्हणून विजयी केले परंतु त्यानंतर आ.प्रकाश सोळंके यांनी अवघ्या काही तासात पहाटेच्या शपथविधीला पाठिंबा दर्शवून भारतीय जनता पक्षाला सहकार्य करण्याची भूमिका घेऊन माजलगाव मतदार संघातील जनतेचा विश्वासघात केला होता, पुढे ईडीच्या भीतीमुळे अजित पवार यांनी भाजप सोबत जाण्याचा घेतलेल्या निर्णयाला संमती दर्शवत आ. प्रकाश सोळंके हे भाजप सोबत गेलेल्या राष्ट्रवादीच्या गटात ईडीच्या भीतीपोटी



सामील झाले, केवळ सत्तेचा माग धरून काम करणाऱ्या आमदार प्रकाश सोळंके यांनी माजलगाव मतदार संघातील जनतेच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करून जनतेला वाऱ्यावर सोडण्याचे पाप केले,परंतु माजलगाव मतदार संघात शेतकरी, कष्टकरी, सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नावर शेतकरी कामगार पक्षाचे लढाऊ नेते भाई ड. नारायण गोले पाटील यांनी आपल्या आक्रमक भूमिकेने अनेक मोर्चे , आंदोलने करून प्रशासनासह शासनाला धारेवर धरत शेतकऱ्यांना न्याय मिळवून देत, शेतकऱ्यांची खते बी बियाण्या मध्ये होणारी लूट, प्रशासनातील अधिकारी कर्मचाऱ्यांकडून होणारी लूट थांबवण्याचे काम शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई ड नारायण गोले पाटील यांनी केले आहे. त्यामुळे महाविकास आघाडीचा माजलगाव विधानसभेचा आश्वासक चेहरा म्हणून जनसामान्यात, शेतकऱ्यांमध्ये त्यांची चांगली प्रतिमा असून सत्तेसाठी नाही तर सत्यासाठी लढणारे धडाडीचे नेते म्हणून त्यांची ओळख सबंध मतदार संघात आहे, विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर अनेक प्रस्थापित राजकीय नेते विविध राजकीय पक्षाची उंबरठे झिजवत असताना प्रमाणिकपणे चळवळीत काम करणारा, धाडसी कार्यकर्ता म्हणून भाई ड. नारायण गोले पाटील यांची वेगळी ओळख आहे, नुकत्याच झालेल्या लोकसभा

पान २ वर...

# झेडपी शाळेची ग्रामपंचायतला क्षेत्र भेट

शैक्षणिक : विद्यार्थ्यांनी जाणून घेतली कार्यप्रणाली



जरंडी/पुण्यभूमी प्रतिनिधी

गाव खेड्यातील मिनी मंत्रालय म्हणून ओळख असलेल्या जरंडी ग्रामपंचायतला शुक्रवारी जरंडी येथील जिल्हा परिषदेच्या शालेय विद्यार्थ्यांना क्षेत्र भेटीत ग्रामपंचायतच्या कारभार विषयी माहिती देण्यात आली

जिल्ह्यात आदर्श ग्रामपंचायतचा दर्जा मिळविलेल्या जरंडी ग्रामपंचायत ला जिल्हा परिषदेच्या सातशे विद्यार्थ्यांनी क्षेत्र भेट देऊन सरपंच ग्रामसेवक यांची कार्य पद्धती जाणुन घेत जरंडी गावाच्या विकास बद्दल माहिती घेऊन खेड्यातील विकासा साठी चालना देणाऱ्या ग्रामसभा विषयी माहिती देण्यात आले यावेळी विद्यार्थ्यांना एक पंचायत विभागाचे चित्रफीत दाखविण्यात आली यावेळी मुख्याध्यापक बाळासाहेब सूळ ,लिपिक संतोषकुमार पाटील लक्ष्मण शेकोगार भुपेंद्र जांभुलकर एल यु मेश्राम वैशाली महाजन राजकुमार दिवेकर सतीश बावस्कर आदींची उपस्थिती होती.

## सत्कार...



**परळी :** येथील संभाजीनगर पोलीस स्टेशनचे नूतन पोलीस निरीक्षक धनंजय ढोणे यांना दिन आसूड पुस्तक भेट देऊन स्वागत करताना पत्रकार धनंजय अरबुने,भगवान साकसमुद्रे , संपादक नितीन ढाकणे ,सय्यद अफसर,सपोनि प्रवीण जाधव ,पोलीस रमेश मिसाळ, समाधान भाजीभाकरे आदी.

# बीडमध्ये तायक्वांदो खेळासाठी स्वतंत्र हॉल!

डॉ.योगेश क्षीरसागर: बीडमध्ये राज्यस्तरीय स्पर्धेचे उदघाटन

बीड/पुण्यभूमीप्रतिनिधी

शहरामध्ये तायक्वांदो खेळाला चांगले वातावरण असून या आधुनिक खेळासाठी बीड शरामध्ये तायक्वांदोसाठी स्वतंत्र हॉल उभारण्यासाठी नक्कीच प्रयत्न केला जाईल, असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केले.शहरातील क्रीडा संकुल येथील इनडोअर हॉलमध्ये ३४ व्या महाराष्ट्र राज्य ज्युनिअर तायक्वांदो स्पर्धेचे शुक्रवारी (दि.२६) थाटात करण्यात आले. या स्पर्धेत ४५० खेळाडूंनी सहभाग नोंदविला. यावेळी उद्घाटक म्हणून डॉ.योगेश क्षीरसागर हे बोलत होते. व्यासपीठावर राज्य संघटनेचे महासचिव मिलिंद पठारे, अध्यक्ष डॉ.अविनाश बारगजे, कोषाध्यक्ष व्यंकटेश करवा यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना डॉ.योगेश क्षीरसागर म्हणाले, तायक्वांदो खेळाबद्दल वेगळे आर्कषण निर्माण झाले आहे. या खेळामुळे शारीरिक क्षमताही वाढ होते. डॉ.अविनाश बारगजे हे ३० वर्षांपासून शहरात तायक्वांदोचे प्रशिक्षण देत आहेत. त्यांनी अनेक आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय खेळाडू घडविले आहेत. नितीन कोटेचा यांच्या मागणीप्रमाणे शहरात तायक्वांदोसाठी अत्याधुनिक हॉल उभारण्याचा विचार असून त्यासाठी नक्कीच मी प्रयत्न करेन, असेही क्षीरसागर म्हणाले. नितीन कोटेचा म्हणाले, बीड शहरात अनेक खेळांना योगेशदादांनी बळ दिले आहे. तसेच,

पान २ वर...




## आंतरराष्ट्रीय खेळाडूंचा सत्कार

ज्ञानेश्वर स्कूलच्या विद्यार्थ्यांकडून भरतनाट्यम बीडचे आंतरराष्ट्रीय खेळाडू अविनाश पांचाळ, सचिन जायभाये, राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झालेला खेळाडू श्रवण तांबारे यांचा यावेळी विशेष सत्कार करण्यात आला. बहारदार सांस्कृतिक कार्यक्रम सादर स्पर्धेच्या उद्घाटनानंतर ज्ञानेश्वर इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी भरतनाट्यमचे बहारदार नृत्य सादर केले. गणेश वंदनाचे नृत्य सादर करून उपस्थितांकडून वाहवाह मिळविली.



# मूकबधिर,अस्थिव्यंग शाळेत उपक्रम!

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

आज दिनांक २६ जुलै रोजी माननीय आमदार पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त मूकबधिर निवासी शाळा नेकनूर व अस्थियग शाळा येथील विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमासाठी नेकनुरचे ज्येष्ठ नेते शोयब आमदार तसेच सतीश मुळे मामा, बिभीषण नन्नवरे,मतीन भाई,प्रशांत हावळे हे उपस्थित होते. या सर्वांनी आ. नमिता ताई मुंदडा यांच्या आदेशान्वये सामाजिक कार्यकर्ते सतीश मुळे मामा यांच्या नेतृत्वाखाली या नेकनुर येथील भाजप कार्यकर्त्यांनी मूकबधिर व अस्थिव्यंग असलेल्या विद्यार्थ्यांना बिस्किट चक्की आणि चिप्स चे पुडे वाटून आपला आनंद द्विगुणीत केला या कार्यक्रमासाठी अस्थिव्यंग शाळेचे मुख्याध्यापक श्री भोंडवे सर तर मूकबधिर शाळेचे मुख्याध्यापक लुचारे सर हे उपस्थित होते त्याचबरोबर शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती होती सदरील कार्यक्रम हा अगदी खेळीमेळीचे वातावरणामध्ये पार पडला.

योजना | अंगणवाडी सेविकांना घरोघरी सर्वेक्षणचे आदेश

# लाडकी बहीणसाठी तेरा हजार बहिणी ऑनलाइन!

सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

सोयगाव सह तालुक्यात एकात्मिक बाल विकास प्रकल्प विभागाचे वतीने ता( एक जुलै ते २५) जुलै दरम्यान तेरा हजार लाडकी बहिणींची नोंदणी केली आहे त्यामुळे आता तेरा हजार लाडकी बहिणी ऑनलाइन झाल्या असून शुक्रवार ते सोमवार चार दिवस महसूल व बाल विकास प्रकल्प विभागाचे वतीने सोयगाव शहर आणि ग्रामीण भागात लाडकी बहीण नोंदणी शिबिर आयोजित करण्यात आली आहे त्यासाठी शुक्रवारी शहरात महसूल चे नायब तहसीलदार गोरखनाथ सुरे प्रकल्प अधिकारी दीपक म्हेत्रे मंडळ यांच्या हस्ते शहरात एका केंद्रावर लाडकी बहीण योजनेचा अर्ज भरण्यात येऊन शुभारंभ करण्यात आला



सोयगाव तालुक्यात लाडकी बहीण योजनेसाठी २२ हजार १३३ महिला पात्र आहे त्यापैकी तेरा हजार एक महिलांच्या ऑनलाइन नोंदणी झाली आहे त्यामुळे सोयगाव तालुक्यात या योजनेत ७० टक्के काम झाले असल्याचे तहसीलदार मनीषा मेने यांनी सांगितले

लाडकी बहीण योजनेचा अंगणवाडी सेविकांना तेरा हजार एक महिला ऑनलाइन केल्या असून शुक्रवारपासून अर्ज भरण्यासाठी वंचित राहिलेल्या महिलांचे सर्वेक्षण हाती घेवून त्यांची नोंदणी करण्याच्या सूचना प्रकाल्प

पान २ वर...

सोयगाव तालुक्यातील वंचित महिलांना पुन्हा नोंदणी साठी सर्वेक्षण हाती घेण्यात आले आहे या सर्वेक्षणात त्या महिलांना अर्ज भरण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे अंगणवाडी सेविका हे सर्वेक्षण करतील

-दीपक म्हेत्रे, तालुका बाल विकास प्रकल्प अधिकारी सोयगाव

सोयगाव तालुक्यात तीन दिवस विशेष शिबिरे आयोजित करून लाडकी बहीण योजनेचा नोंदणी वाढवून जास्तीत जास्त पात्र महिलांना या योजनेचा रक्षा बंधन दिनी लाभ देण्यात येईल

-मनीषा मेने, तहसीलदार सोयगाव

# शासनाच्या उपक्रमासाठी वाचन साहीत्य

धोरण:ग्रंथपाल शीलाताई उजगरे यांची माहिती

वडवणी/पुण्यभूमी प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाच्या परिपत्रकानुसार राज्यातील सर्व शाळांमध्ये २२ जुलै पासून महा वाचन उत्सव सुरू झाला आहे. या उपक्रमामध्ये वडवणी तालुक्यातील पिंपरखेड येथील छत्रपती शाहू महाराज वाचनालयाने सक्रिय सहभाग घेतला आहे. शासनाच्या या उपक्रमासाठी जे वाचन साहित्य गरजेचे आहे ते सर्व साहित्य उपलब्ध करून देण्याची भूमिका वाचनालय प्रशासनाची आहे. या वाचन उत्सव उपक्रमात सर्व विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे असे आवाहन वाचनालयाच्या ग्रंथपाल सौ. शिलाताई उजगरे यांनी केले.

वडवणी तालुक्यातील पिंपरखेड येथील छत्रपती



शाहू महाराज वाचनालयात वाचनालयाचे संस्थापक प्राध्यापक प्रकाश खळगे सर यांच्या मार्गदर्शनाखाली मागील अनेक वर्षापासून शासनाच्या नियमाचे पालन करीत वर्षभर विविध उपक्रम राबविले जातात शासनाने ठरवून दिलेल्या नियमावली नुसार सर्व वाचकांना आवश्यक ती सर्व ग्रंथ संपदा त्याचबरोबर शेती, आरोग्य, शिक्षण, शालेय, महाविद्यालयीन आणि स्पर्धा परीक्षेला उपयोगी पडणारे सर्व पुस्तके उपलब्ध करून दिले जातात. त्याचबरोबर या वाचनालयाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा, त्यांची बौद्धिक क्षमता वाढावी

पान २ वर...